# श्री साईलीला



## या अंकांत—


१ श्रीसाईबाबांचें पुण्यस्मरण
२ जगांत अस्वस्थता कशामुळें ?
३ श्रीसाईबाबांचीं वचनें
४ अरविंदाश्रमांतील माताजी
५ निर्विकल्प व्हावें अंतकाळीं
६ अधीन केलें मज तेणें
७ साई-कृपा
८ श्रीगजानन महाराज शेगांवकर
९ उतरा ही पायरी
१० स्वामी विवेकानंदांचें एक पत्र
११ नाममहात्म्य
१२ मुंडकोपनिषद् आणि विज्ञान
१३ स्वामी विवेकानंदांचें सुयोग्य स्मारक
१४ शास्त्र व तत्त्वज्ञान
१५ योगिराज गुळवणी महाराज परिचय
१६ गीतेचें सारभूत मार्गदर्शन
१७ शिरडी-वृत्त



# श्री साई वाक्सुधा

मृत्यूचें बोलावणें कोणत्याही क्षणीं येईल, त्याची आठवण सदासर्वकाळ असावी. हा देह म्हणजे त्या काळाचें भक्ष्य आहे. हें ध्यानीं बाळगून प्रपंचांत अत्यंत सावधानतेनें वावरावें. सर्वांशीं प्रेमानें व विचारपूर्वक वागावें. कोणाचे शिव्याशाप घेऊं नयेत. प्रपंच चालविण्यांत आळस मुळींच करूं नये. प्रपंच शहाणपणानें करावा व त्यायोगे परमार्थ साध्य करावा.

—श्रीसाईसच्चरित

---


श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक. ]

वर्ष ४९ वें ] आक्टोबर १९७० [ अंक ७ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ,

प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४

# श्रीसाईबाबांचें पुण्यस्मरण

नवसास माझी पावेल समाधी
धरा दृढ बुद्धि माझ्या ठायीं
नित्य मी जिवंत जाणा हेंचि सत्य
नित्य घ्या प्रचीत अनुभवें

--श्रीसाईबाबा

**प्रिय वाचक—**

श्रीसाईबाबा समाधिस्थ झाल्यास बावन वर्षें पूर्ण होऊन त्रेपन्नावें वर्ष सुरू होत आहे. विजयादशमी हा त्यांचा पवित्र समाधिदिन; आणि त्या निमित्त प्रतिवर्षाप्रमाणे श्रीसाईलीला मासिकाचा हा विशेषांक आमच्या प्रिय वाचक बंधू भगिनींच्या हातीं देतांना आम्हांला एक प्रकारचें सात्विक समाधान वाटत आहे.

श्रीसाईबाबा यांच्यासारख्या सत्पुरुषाचा जन्म हा लोककल्याणासाठीं असतो. दुःखितांचें दुःखनिवारण करणें, त्यांचे अश्रू पुसून त्यांना या जगांत सुख-समाधान व आनंद लाभावा यासाठीं झटणें हेंच सत्पुरुषांचें जीवनकार्य असतें. ईश्वरी प्रेरणेनें ते या जगांत अवतीर्ण होतात व आपलें कार्य संपवून जगाचा निरोप घेतात.

श्रीसाईबाबानीं शिरडींत अवतीर्ण होऊन लोककल्याणाचें कार्य अखेरच्या क्षणापर्यंत पार पाडलें. आणि सर्वांचा प्रेमळ निरोप घेतांना ठासून सांगितलें कीं, मी चाललों, मी आतां दृष्टिआड होणार म्हणून मुळींच दुःखी-कष्टी होऊं नका. मी सतत तुमच्यांतच आहें. माझ्याठायीं दृढ बुद्धि ठेवा, श्रद्धा ठेवा व माझ्यावर मनापासून प्रेम करा. म्हणजे मी तुमच्यापासून क्षणभरही दुरावणार नाहीं. मला तुमच्या कडून फक्त तुमचा भक्तिभाव पाहिजे.

आणखी कशाचीही अपेक्षा मी तुमच्याकडून करीत नाहीं. मी तुम्हांला सोडून दूर कसा जाईन ? मी सतत तुमच्या सन्निध आहे. मात्र हें ओळखून व मी तुमच्याजवळ आहें याची खूणगांठ मनाशीं बांधून या जगांतील रोजचे व्यवहार करा. तुम्हीं सुखी होण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. तो तुम्ही स्वीकारा. मी तुम्हाला सोडून गेलों नाही. याची प्रचीति तुम्हीं घेऊ शकतां.

बाबानीं हें जें कांहीं तत्त्वज्ञान सांगितलें तें त्रिवार सत्य आहे. ते दृष्टिआड झाल्यास बावन वर्षें पूर्ण झाली तरी त्यांच्या अस्तित्वाची प्रचीति आजहीं त्यांच्या भक्तांना जे जे मनोभावें त्यांची आठवण करतात त्याना येत आहे. वर्षामागून वर्षें जात आहेत; परंतु शिरडी क्षेत्रांत येणाऱ्या किंवा न येणाऱ्या भक्तांची संख्या उत्तरोत्तर व सतत वृद्धिंगत होत आहे. ती का बरें ? कारण बाबा त्यांच्या नवसास पावत आहेत. 'नवसास माझी पावेल समाधी' हें त्यांनीं दिलेलें वचन गेलीं ५२।५३ वर्षें त्यांच्या भक्तांच्या प्रचीतीस अहर्निश येत आहे, पुढेंही तें येत राहील हें निःसंशय होय.

बाबा हें आमचें आशास्थान व आश्रयस्थानही आहेत. या जगांत ज्यानें बाबांचा आश्रय घेतला त्याला कोणत्याही बाबतींत निराश होण्याची जरूरी नाहीं. मात्र त्यानीं म्हटल्याप्रमाणें आम्हीं निस्सीम भक्ति-भावानें त्यांना आपलेसे केलें पाहिजे—त्यांना जिंकलें पाहिजे.

बाबांना भक्तिभावानें आपलेसे करण्याचा, त्यांना जिंकण्याचा आपण नेर्धार करूं या व तसें सामर्थ्य व बुद्धि आम्हांला देण्याची त्यांच्या चरणापाशीं आपण प्रार्थना करूं या.

—संपादक.


# आज जगांत अस्वस्थता कशामुळें? आमच्या संस्कृतीची सर्वांगसुंदरता

अनुवादक :- श्री. आप्पाराव

या लेखाचे मूळ लेखक आहेत श्री पंद्रिमलाई स्वामीजी. त्यांची ओळख एका 'सत्पुरुषाचा परिचय' (साईलीला जून १९७०) या लेखाच्या द्वारें आमच्या वाचकांस यापूर्वीच करून देण्यांत आलेली आहे. हिंदु संस्कृतीचें व ती आचरणांत आणण्याचें महत्व सांगतांना त्यांनीं जें कांहीं सांगितलें आहे तें सर्वपरिचित असलें तरी जें सांगितलें आहे तें फार महत्त्वाचे आहे.

## संस्कृतीचा खंबीर पाया

आपली हिंदु संस्कृती अत्यंत श्रेष्ठ व सर्वांगसुदंर आहे. तशीच ती पवित्र व हिमालयाप्रमाणें प्राचीन आहे. तिचा स्वीकार करून जो कोणी त्या मार्गानें जाईल त्याच्यासाठीं फार उत्तमप्रकारचें मार्गदर्शन त्या संस्कृतीत आहे.



तिचा पाया खंबीर अशा वेदांवर रचलेला आहे. उपनिषदें, गीता, रामायण, महाभारत व श्रीमद्भागवत हे त्या वेदाचें सोबती आहेत. या सर्वांनी मिळून हिंदुसंस्कृतीचा पाया रचिला आहे.

हा एक जीवनमार्ग असा आहे कीं जेथें पदोपदीं देवत्वाशीं संबंध येतो. मानवांना समर्पण केलेलें हें असें तत्त्वज्ञान आहे कीं त्याच्या सहाय्यानें मानव देवत्वाशीं व साऱ्या जगताशीं एकरूप होऊं शकतो; प्रत्यक्ष देवत्वाप्रत पोहोचूं शकतो.

हा असा मार्ग आहे कीं जो ' तत् त्वम् असि ' व ' अहं ब्रह्मास्मि ' असें म्हणूं शकतो व त्या पदाला पोहोचूं शकतो.

श्रीरामचंद्रानें एकदां हनुमंताला प्रश्न विचारला कीं, " अरे बाबा ! तूं कोण आहेस ? " त्यानें जें उत्तर दिलें त्या पदाप्रत मानव पोहचूं शकतो. काय ते उत्तर ?

## हनुमंताचें उत्तर

हनुमंतानें सांगितलें कीं, " मी कोण आहें तें सांगतों. शरीराच्या दृष्टीनें सांगायचें तर मी तुमचा सेवक आहें. जीवाच्या दृष्टीनें सांगायचें तर मी तुमच्याच एक भाग आहें. आणि आत्मा या दृष्टीनें सांगायचे झाल्यास मी श्रीरामचंद्रच आहें. मी कोण या बाबतींत असें हें माझें ठाम मत आहे. "

या जीवनाचें मूलभूत तत्त्व कोणतें ? आत्मानुभूति हेंच. या जगांत मी जो जगतों आहें, वावरतों आहें, तो कशासाठीं ? मी देवाचा व्हावें, मी देवासाठीं जगावें, झगडावें व जें कांहीं करावयाचें तें त्याच्या नावानें त्याच्यासाठींच करावें.

वेद, उपनिषदांतून जें मार्गदर्शन करण्यांत आलें आहे त्या मार्गानें जाऊन प्राचीन काळीं आमच्या ऋषिमुनींनी ती अनुभूति घेतली आहे. ते नियम त्यानीं कठोरपणें अंमलांत आणले आहेत.

प्रत्येकाच्या ठायीं भगवंताचें अधिष्ठान आहे. सर्व जगाच्या कल्याणासाठीं तें अधिष्ठान उपयोगांत आणून त्याच दृष्टीनें आपण प्रत्येकाकडे पहावयाचें आहे. सर्वांचें संरक्षण कर, सर्वांना शांतता लाभूं दे. व सर्वांचें कल्याण होऊं द्या. अशी प्रार्थना करण्यांत आली आहे. आमच्या यज्ञयागाचे रक्षण कर अशीही प्रार्थना करण्यांत आली आहे.

## त्याग हें प्रमुख तत्त्व

यज्ञ, त्याग हें हिंदु-संस्कृतीचें प्रमुख तत्त्व आहे. यज्ञांत तूप किंवा आहुत्या अर्पण करायच्या, एवढ्यानें यज्ञकार्य पूर्ण होत नाहीं; तर इतरेजनांसाठीं, आम्हीं स्वतःच्या जीवनाचा भोग द्यावयाचा, इतरांसाठीं प्राणपणानें झटावयाचे यात यज्ञ तत्त्वाचा अंतर्भाव झालेला आहे. या त्यागाच्या कल्पनेत सर्वांचें कल्याण अंतर्भूत आहे.

मी ज्यांच्यामध्यें वावरतो ते व मी दोन नाहीं. आम्हीं एकच आहोत. त्यासाठी आम्ही एकमेकांच्या कल्याणाकरिता झटायचे आहे. हा मार्ग आम्ही स्वीकारला म्हणजे अशांततेला कुठेही वाव रहाणार नाही.

हिंदुसंस्कृती धर्माला अग्रपूजेचा मान देते. प्रत्येकाने आपापल्या धर्माप्रमाणे वागावे. धर्माप्रमाणे म्हणजे कसे ? प्रत्येकाने स्वतःसंबंधीचे कर्तव्य काटेकोरपणे पाळावे. तसेच आपल्या कुटुंबीयासंबंधीं व समाजबांधवासंबंधी आपले कर्तव्य ओळखून त्याचे इमाने इतबारे पालन करावे.

## कुटुंब प्रमुखाचे कर्तव्य

कौटुंबिक कर्तव्य कसे पाळायचे ? माझ्या कुटुंबामध्यें जी जी माणसे आहेत त्यांचे कल्याण मी साधावयाचे, त्यासाठी मी मनोभावे झटावयाचे, त्यांच्यावर प्रेमाची पाखर घालावयाची. त्याना मार्गस्थ करावयाचे. प्रत्येक कुटुंब हा समाजाचा एक भाग आहे. कुटुंबधारकाने तो भाग उत्तमप्रकारे सांभाळावयाचा आहे.

जो कुटुंबाचा प्रमुख असेल त्याने आपल्या पूर्वज पितरांची व देवांची आठवण ठेऊन त्याना संतोष होईल, त्यांचे आशीर्वाद मिळतील अशा रीतीनें वागावयाचें. मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव व अतिथिदेवो भव. हे महान् मंत्र लक्षांत ठेऊन ते आचरणांत आणण्यासाठी झटावयाचें.

आई म्हणजे प्रत्यक्ष देव. ती आपणास जन्म देते व लहानाचा मोठा करते. आमच्यावर प्रेमाचा पाऊस पाडते. म्हणून ती देवासमान. वडील आपणास हा देह देतात व शिक्षण वगैरे देऊन मार्गाला लावतात; म्हणून त्यांना देवासमान मानावयाचें. आचार्य गुरुजी आपणास ज्ञानप्राप्ति करून देतो. आपल्यावर दैवी संस्कार घडवितो म्हणून त्यालाही देवासमान मानावयाचें. आपल्याकडे येणारा अतिथी म्हणजे तो नारायणच होय; आणि म्हणून आपण त्याला भोजन देऊन संतुष्ट करावयाचें.

## धर्मराजाची शिकवण

आम्हीं कोणते गुण अंगीं बाणवावे याचें धर्मराजानीं फार सुंदर स्पष्टीकरण केलें आहे. ते म्हणतात — सत्य ही माझी माता आहे, ज्ञान हा माझा पिता

आहे, दया हा माझा जिवलग मित्र आहे, शांती ही माझी प्रियतमा पत्नी आहे आणि क्षमा हा माझा सुपुत्र आहे.

हिंदु संस्कृतीचे हे सहा खंबीर खांब आहेत. या खांबावर हिंदु संस्कृती मानानें खडी आहे. प्रत्यक्ष धर्मराज हे तिचे प्रतीक आहेत.

आम्हीं जगांत कसें वागावें व कोणत्या गुणांची कास धरावी हें जसें धर्मराजानीं सांगितलें तसेंच त्यांचे धाकटे बंधू नकुळ यानींही त्याला पुस्ती जोडून आम्हांला मार्ग दाखविला आहे. दुसऱ्यांच्या बायका म्हणजे आपल्या माता ही दृष्टि आपण बाळगली पाहिजे. दुसऱ्याची संपत्ति किंवा पैसा आडका म्हणजे दगडमाती मानणारा हा सत्पुरुषाच्या कोटींतील मानव होय. हे तिन्हीं गुण प्रत्येकानें स्वतःच्या अंगीं बाणविण्याची पराकाष्ठा केली पाहिजे.

## वैवाहिक जीवनाचें पावित्र्य

वैवाहिक बंधन पवित्र मानणें व त्याचें पावित्र्य सांभाळणें हें हिंदु संस्कृतीचें एक प्रमुख अंग आहे. पत्नी म्हणजे सहधर्मचारिणी. पती जें जें कांहीं करतो त्याला हातभार लावणारी, आपला संपूर्ण सहकार देणारी व त्याच्या पावला-वर पाऊल टाकून चालणारी ती पत्नी. पती-पत्नीचें हें नातें जसें पवित्र तसेंच शाश्वत आहे. पातिव्रत्य हा हिंदु स्त्रीच्या जीवनांतील अत्यावश्यक भाग आहे. सीता, सावित्री, अनसूया यांच्या सारख्या विदुषी पतिव्रता हा आमच्या स्त्रियांपुढील आदर्श आहे. तेवढ्यावरून आमच्या संस्कृतीचा दर्जा किती उच्च आहे याची कोणालाही कल्पना करतां येईल. प्रत्येक कुटुंबियाने आपलें कुल व गोत्र पवित्र ठेवण्यासाठीं झटावयाचें हें या संस्कृतीचें एक लक्षण आहे. कौटुंबिक जीवनाचा व कौटुंबिक पावित्र्याचा आधार म्हणजे स्त्रियाच होत. त्या बिघडल्या म्हणजे सर्व कुटुंबाचा नाश झाला असे समजावयाचें.

आदर्श पुरुष कसा असावा, आदर्श स्त्री कशी असावी, आदर्श माता कशी असावी, आदर्श बंधू, आदर्श मित्र व आदर्श अनुयायी कसा असावा, हें वाल्मीकीनें रामायणाच्या द्वारे आपल्यापुढें ठेवलें आहे.

## थोडक्यांत सार

आमच्या संस्कृतीचे शेवटीं थोडक्यांत सार सांगायचें झाल्यास तें अवघ्या दोन वाक्यांत सांगता येईल. 'सत्यं वद' आणि 'धर्मं चर.'

हें ठीक आहे; परंतु आपण सध्या काय बरं पहात आहोत ? सध्या आपण पहात आहोंत — ‘ सत्यं वध ’ — सत्याचा खून पाडा; आणि अधर्मं चर— अधर्मानें स्वैरपणें, वाटेल तसें वागा !

आज जिकडे पहाल तिकडे सर्वत्र हाच प्रकार जोमानें चालू असलेला तुम्हांला आढळून येईल. आज जगांत अस्वस्थता, अस्थिरता व अशांतता नांदत असलेली दिसत आहे; त्याची कारणें शोधायला दूर जाण्याची जरूरी नाहीं.

—भवान्स जर्नलच्या कृपेनें साभार

## श्रीसाईबाबांचीं वचनें



शिरडीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ॥
माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हें हरेल सर्व त्याचें ॥
जरी हें शरीर गेलों मी टाकून । तरी मी धांवेन भक्तांसाठीं ॥
नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धी माझ्या ठायीं ॥
नित्य मी जिवंत जाणा हेंचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवें ॥
शरण मज आला आणि वायां गेला । दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥
जो जो मज भजे जैशा जैशा भावें । तैसा तैसा पावें मीही त्यासी ॥
तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हें अन्यथा वचन माझें ॥
जाणा येथे आहे साहाय्य सर्वांस । मागे जें जें त्यास तें तें लाभे ॥
माझा जो जाहला काया वाचा मनीं । तयाचा मीं ऋणी सर्व काळ ॥
साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य । झाला जो अनन्य माझ्या ठायीं ॥

# अरविंदाश्रमांतील माताजी
# व
# त्यानीं चालविलेले कार्य

लेखक : **श्री आप्पाराव**

**योगी अरविंद यानीं पांडिचेरी येथें गेल्या पन्नास वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या आश्रमातर्फे फार महत्त्वाचें व भारताच्याच नव्हे तर अखिल जगाच्या कल्याणाचें कार्य होऊन राहिलेलें आहे. श्री. अरविंदानंतर त्या आश्रमाच्या संचालिका व अधिष्ठात्री देवता मीरा माताजी यांचा व त्याच्या प्रेरणेनें तेथें चाललेल्या कार्याचा हा आहे अल्प परिचय.**

—संपादक

भारतीय जनतेचें मार्गदर्शन करणारी थोर माणसें वेळोवेळीं या देशांत अवतीर्ण होत आलीं आहेत व आजही आमचें मार्गदर्शन करणारी दैदीप्यमान माणसें या देशांत वावरत आहेत, आमच्या उद्धारासाठीं झटत आहेत. आपण त्यांचा व त्यांच्या कार्याचा परिचय करून घेतला पाहिजे व त्यांच्या हालचालीकडे लक्ष पुरविलें पाहिजे.



पांडिचेरी येथें योगी अरविंद यानीं स्थापन केलेल्या अरविंदाश्रमाच्या सध्याच्या चालिका व ज्या आश्रमांत व बाहेरही 'माताजी' या नावानें ओळखल्या जातात, त्या वर उल्लेखिलेल्या महनीय व्यक्तीपैकीं एक आहेत. आज त्यांच्या वयास ब्याण्णव वर्षे होऊन गेलीं आहेत. त्या फ्रेंच महिला आहेत. त्या भारतात कशा आल्या, योगी अरविंदांचें शिष्यत्त्व त्यानीं

कसें स्वीकारलें व आज त्यानीं आश्रमांत चालविलेल्या कार्याचें स्वरूप काय आहे, हें समजून घेण्यासारखें आहे.

माताजींचा जन्म पॅरीस शहरांत ता. २१ फेब्रुवारी १८७८ रोजी झाला; त्यांचे वंशज इजिप्तमधून फ्रान्समध्ये आले; त्यांचे वडील हे त्या काळांतील एक बँकर होते. पैशांच्या देवघेवीचा व्यवहार ते करीत असत. माताजींचें नाव आहे मीरा. बालपणापासून मीरा अत्यंत शांत व विचारी होती. ती शाळेंत बरीच उशीरां जाऊं लागली. तिची बुद्धी तल्लख होती, आपल्या अभ्यासांत ती हुशार होती. शिवाय चित्रकला व गायनकला या कलांचीही तिला आवड होती.

माताजी



दुसऱ्यांवर प्रभाव पाडण्याचा गुण मीराच्या ठायीं विद्यार्थिदशेपासून होता. आपल्या बरोबरच्या सोबत्यांवर तिच्या वागणुकीचा परिणाम घडून येत असे. कांहीं तंटेभांडणे किंवा कटकटी निर्माण झाल्या असतां त्यांचा निर्णय लावून घेण्यासाठीं वर्गातील समवयस्क मुलें विश्वासानें तिच्याकडे येत आणि तिच्याकडून सर्वमान्य असा निर्णय तत्काळ दिला जात असे. हे एक अजोड सामर्थ्य बालवयापासून तिच्याठायीं होतें.

मीराचें वयोमान जसजसें वाढूं लागलें तसतशी तिला एकांताची आवड वाटू लागली. नजीकच्या जंगलांत जाऊन एकाद्या जीर्ण, जुनाट वृक्षाखालीं विचार करीत ती बसत असे. तिला निसर्गाचें भारी आकर्षण होतें. माणसांपेक्षां तिला निसर्गाचा सहवास फार आवडे. झाडांवर उड्या मारणारे पक्षी आणि खारी तिच्या जिवलग मैत्रिणी होत्या. त्यांच्या जीवनक्रमाकडे ती बारकाईनें पहात राही.

मीरा बारा वर्षांची झाली आणि एकांतांत असतां व विचार करतां करतां तिला कांहीं ना कांहीं भास होऊं लागला. तिच्या दृष्टीपुढें एक सुंदर दैदीप्यमान चेहरा दिसावयाचा. तो पुन्हां पुन्हां तिच्या दृष्टीपुढें यायचा. त्याला ती कृष्ण या नावानें ओळखू लागली. कधीं कधीं तिला स्वप्नें पडायचीं. त्या स्वप्नांत साऱ्या जगाचा भार आपल्या मस्तकावर येऊन पडत

आहे व आपल्या हस्तस्पर्शानें तो भार हलका होत आहे असा भास तिला कधीं कधीं व्हावयाचा.

चालू शतकाच्या आरंभीं मीराबाई आल्जिरियांत गेल्या. कशासाठीं ? गूढ-विद्येची माहिती करून घेण्यासाठीं, तेथें गूढविद्या पारंगत असे एम्. थिआन नावाचे एक गृहस्थ होते. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं गूढविद्येंत व त्या शास्त्रांत त्यांची झपाट्यानें प्रगती होत गेली.

त्या परत पॅरीसमध्यें आल्या. तेव्हां ज्याना साक्षात्कार व्हावा गूढविद्येचें व दैवीशक्तीचें ज्ञान व्हावें असें, मनापासून वाटे, अशा तरुण तरुणीचा घोळका त्यांच्या सभोवार गोळा झाला. त्यांच्याशीं वार्तालाप करणे एकमेकांच्या शंकांचे निवारण करण्याचा प्रयत्न करणें, चर्चा करणें हे कार्यक्रम सुरू झाले व त्यांत मीराबाईंच्या वाट्यास महत्त्वाचें स्थान येऊं लागलें. व तें स्थान त्या समर्थपणें शोभवूं लागल्या. अज्ञान, अन्याय व अत्याचार यापासून प्रत्येकाची सुटका करण्यांत आली पाहिजे. त्यांच्या विरुद्ध झगडण्यांत आलें पाहिजे, त्यासाठीं जरूर ती ताकद प्रत्येकांत निर्माण करण्यांत आली पाहिजे. त्यांची जागा ज्ञान, स्वातंत्र्य व शांतता यानीं घेतली पाहिजे. या तिन्हीं गोष्टींचें प्रत्येकाच्या जीवनांत बहुमोलाचें स्थान आहे. ही त्रयी प्रत्येकाच्या आटोक्यांत आली पाहिजे.

१९१२ सालीं या मीराबाईंना एक निश्चित व विशिष्ट प्रकारची प्रेरणा झाली. ती कोणती ? यापुढील काळांत जागतिक ऐक्याची, जागतिक एकात्मतेची उत्तरोत्तर वाढ होत गेली पाहिजे, जागतिक एकात्मकता हें आमचें ध्येय बनलें पाहिजे.

त्यांना हा जो साक्षात्कार झाला त्याचें पर्यवसान त्यानंतर छप्पन्न वर्षांनीं पांडिचेरीच्या परिसरांत त्याच हेतूच्या सिध्यर्थ 'आरोव्हिली' या नावानें आंतरराष्ट्रीय केंद्र स्थापन करण्यांत झाला. त्याच्या मागें मीरामातेची शक्ति आहे. या जागतिक केंद्राची स्थापना ता. २८ फेब्रुवारी १९६८ रोजीं समारंभपूर्वक झाली. त्यावेळीं जगांतील अनेक कीर्तिवंत थोर पुरुष हजर होते. आपल्या मुंबईचे रहिवासी श्री. सयाजीराव सिलम हे त्यावेळीं पांडिचेरीचे ले. गव्हर्नर होते.

त्यानंतर कांहीं काळपर्यंत मीराबाईना स्वप्नसृष्टींत कांहीं संतांचें दर्शन घडायचें; व त्यापैकीं कित्येकांचें प्रत्यक्ष दर्शन त्यांना नंतरच्या काळांत भारतांत आल्यानंतर घडले. परंतु त्यांच्यापुढें वारंवार जें एक मुखकमल यायचें व ज्याला त्या कृष्ण या नावानें संबोधायच्या. त्याचें दर्शन मात्र त्याना तदनंतर बऱ्याच वर्षांनी घडायचें होतें.

पॉल रिचर्ड यांच्याशीं नंतर त्या विवाहबद्ध झाल्या. हे पॉल रिचर्ड भारतांत आले असतां १९१० सालीं पांडिचेरी येथें त्यांची व योगी अरविंदांची भेट झाली. त्यांच्या सहवासांत आल्यानंतर तत्कालीन जगातील सर्वश्रेष्ठ दिव्य पुरुष, व भावी काळाचे श्रेष्ठ नेते असें त्यांचें वर्णन त्यानीं केलें आहे.

मीराबाईना योगी अरविंदांस भेटण्याची ओढ लागल्यावरून त्या पॅरीस सोडून पांडिचेरी येथें आल्या. त्यांची आणि त्या योगेश्वरांची ता. २९ मार्च १९१४ रोजीं भेटगांठ घडून आली. आपल्या स्वप्नसृष्टींत ज्यांना आपण वारंवार पाहिलें ते श्रीकृष्ण हेच होत हें त्यानी ताबडतोब ओळखलें. वर्षानुवर्ष त्या आपल्या दैनंदिनींत स्वप्नांत भेटणाऱ्या त्यां महापुरुषाची नोंद करून ठेवीत असत. ( हें मागाहून समजलें. )

त्यानी आपल्या दैनंदिनीच्या एका पानांत लिहिलें होतें—"आत्यंतिक अज्ञानपंकांत बुडून गेलेलीं शेकडो माणसें असेनात का. ज्याला मी काल पाहिलें ते या पृथ्वीतलावर कुठें तरी आहेत. त्यांचे अस्तित्वच काय दाखवितें? एक दिवस असा उजाडणार आहे कीं त्या दिवशीं कभिन्न अंधकाराची जागा दिव्य प्रकाश व्यापून टाकणार आहे. एक दिवस त्या दिव्यत्वाचें साम्राज्य या अवनीतलावर प्रस्थापित होणार आहे!"

ज्यावेळीं त्या दोघांची भेट झाली तेव्हां त्यांपैकीं प्रत्येकाला वाटलें कीं आपला अध्यात्म सवंगडी शेवटीं सांपडला.

ऑगस्ट १९१४ मध्यें प्रथम पॉल रिचर्ड व योगी अरविंद या दोघांच्या संपादकत्वाखालीं 'आर्य' मासिक सुरू झालें. तें दरमहा प्रसिद्ध व्हावयाचें. सुमारें सहा वर्षें त्या मासिकाचें अस्तित्व होतें.

महायुद्ध सुरू झालें तेव्हां मिराबाई परत फ्रान्सला गेल्या. तेथून नंतर त्या जपानला गेल्या. त्या देशांत असतां टोकिओ व कियोटो या भागांत त्यानीं कांहीं उपयुक्त कार्य केलें.

शेवटीं १९२० सालीं त्या पांडिचेरी येथें श्रीअरविंद व त्यांचा शिष्य-परिवार यांच्याबरोबर रहाण्यासाठीं कायमच्याच भारतांत आल्या. त्या गोष्टीला आतां पन्नास वर्षे झाली. त्या काळांत त्यानीं केलेल्या कार्याचें महत्त्वमापन करण्याची वेळ कधीं तरी येईलच. तें कार्य बहुमोलाचें आहे.

ता. २४ नोव्हेंबर रोजीं आश्रमाचा सर्व कारभार माताजीच्या हातीं सोपवून श्रीअरविंद हे दीर्घकालीन एकांतवासांत गेले.

१९२६ सालीं अरविन्द आश्रमांत अवघे पंचवीस साधक होते. आणि आज त्यांची संख्या वाढत वाढत पंधराशेवर जाऊन पोहोंचली आहे. तेथें जें अंतरराष्ट्रीय शैक्षणिक केंद्र स्थापन करण्यात आलें आहे, त्यांत किती तरी मुलें नवीन धर्तीचें शिक्षण घेत आहेत. हें शिक्षणकेंद्र म्हणजे आश्रमाचाच एक भाग आहे.

आपल्या नव्वदाव्या वाढदिवसप्रसंगीं त्या म्हणाल्या होत्या कीं, मी प्रथम १९१४ सालीं भारतांत आलें. उद्देश होता श्रीअरविन्द यांना भेटण्याचा. पुन्हां १९२० सालीं मी भारतांत आलें, ती श्रीअरविन्द यांच्या जीवन कार्याशीं समरस होऊन. त्यांच्या कार्यांत सहभागी होण्यासाठीं. ते ५ डिसेंबर १९५० रोजीं या जगाचा कायमचा निरोप घेऊन गेले आणि त्यानीं सुरू केलेलें महान् कार्य पुढें सतत चालू रहावें. यासाठीं मी येथेच राहिलें. फ्रान्समध्यें मी जन्म घेतला असता तरी पांडिचेरीला आल्या दिवसापासून भारत हाच माझा खराखुरा देश आहे. माझ्या आत्म्याशीं एकरूप होणारा तोच हा देश आहे."

आणि हें खरें आहे कीं माताजी म्हणजे भारतीय आध्यात्मिक ऐक्याचें प्रतीक आहेत. त्यांचे भक्त याच देशांत नाहींत तर साऱ्या जगभर विखुरलेले आहेत. त्या सर्वांना माताजी म्हणजे सर्वस्व वाटत असते. दिव्यत्वाचा लाभ घडविणारी ती दैवी माता आहे असें त्यांना वाटत असतें.

पांडिचेरी आश्रमाच्या त्या गेल्या सुमारें ४०।५० वर्षांपासून संचालिका आहेत. या प्रचंड जगांतील तें एक वेगळे जग आहे. त्या जगांत वावरणारीं माणसें—साधक पूर्णत्वासाठीं सतत प्रयत्नशील आहेत. तेथें

शैक्षणिक, कलाविषयक, औद्योगिक, शेतकीविषयक व व्यवस्थापकीय अशा नानाप्रकारच्या हालचाली, चळवळी एका विशिष्ट ध्येयानें चालू आहेत. योग हा त्यांचा पाया आहे. 'योगः कर्मसु कौशलम्' या ध्येयानें तेथें प्रत्येक कार्य चाललें आहे. श्री. अरविन्दांच्या म्हणण्याप्रमाणें जीवनांतील प्रत्येक कार्य त्या योगाच्या छायेखालीं चाललें पाहिजे. जें जें कार्य आपण हातीं घेऊं तें तें संपूर्णपणें कौशल्यपूर्वक, उत्तमप्रकारें पार पाडण्यासाठीं प्रत्येकानें झटावयाचें आहे. माताजीनी आपल्या एका भक्ताला १९५६ सालीं लिहिले होतें कीं दैवी जीवन कशाला म्हणावयाचें? तुम्हीं कोणतेंही मोठें किंवा लहानांत लहान कार्य हातीं घ्या. तें तुम्हीं समर्पण बुद्धीनें, मनापासून व लक्ष सर्वस्व त्यांत घालून पार पाडण्यासाठीं झटत राहिला तर तुम्हीं त्यायोगें दैवी जीवन जगण्याचा मार्ग मोकळा कराल. हें देवाचें कार्य मी पार पाडीत आहें. ही भावना तुमच्या ठायीं जागी झाली पाहिजे. तेथें अहंकाराला जागा रहातां कामा नये. जें कांहीं करीत आहें तें मला देवाला अर्पण करायचें आहे, हें कार्य मी त्याच्यासाठीं करीत आहें. या भावनेचा दीप तुमच्या अंतःकरणांत सतत तेवत राहिला पाहिजे.

माताजींची दिव्य दृष्टि निश्चितपणें भविष्य काळाकडे लागून राहिलेली आहे. गत काळांतील प्रभात वेळा मागें पडल्या. आमचा संबंध त्यांच्याशीं नाहीं. आम्हीं भावी काळांतील दुपारसाठीं आहोत. असें श्रीअरविंदानीं एकेठिकाणीं म्हटलें आहे.

माताजी १९५७ सालीं म्हणाल्या होत्या — "आम्हाला नवनिर्मिती करावयाची आहे. सर्व परीने नवनिर्मिती करीत असता अनपेक्षित गोष्टी घडतील, संकटें येतील तीं उल्लंघन करावी लागतील; हे एक धाडस असलें तरी त्यांत आम्हीं विजयश्री मिळविणार हें निश्चित आहे. आम्हाला नव्या वाटा पाडाव्या लागतील आणि एकेक पाऊल टाकीत त्या वाटा चोखाळाव्या लागतील.

आणि आजकाल पांडिचेरी आश्रमांत छोट्या मुलांकडे विशेष लक्ष पुरविलें जातें तें याच दृष्टीनें. ते भावी काळांतील आमचें योद्धे आहेत. जीवनाच्या युद्धकलेंत त्यांना तरबेज करायचें आहे. ते आमचे 'अमृत-पुत्र' आहेत. सर्व जगांतील लोक निर्भय व सुखी व्हावे, त्यानीं देवत्व प्राप्त करून घ्यावें व या भूलोकावर देवकलो

निर्माण व्हावा यासाठीं त्यानीं तपस्या चालविली आहे. प्रथम या कार्याचें दृश्य फळ आश्रमांत, त्या आश्रमाच्या शाखांतून व नवीन स्थापन केलेल्या ऑरोव्हिली केंद्रांतून अनुभवास यावयाचें आहे. तो प्रकाश सर्व भारताला व नंतर सर्व जगाला व्यापून राहावा असा याच्या बुडाशी उच्च हेतू आहे. त्यामुळें एक अभिनव मानवजात निर्माण होणार आहे. त्यामुळें काय होणार आहे ? मानव नानाप्रकारच्या भयाच्या दडपणाखालीं गुदमरला जात आहे. त्यापासून त्याची सुटका होईल व तो निर्भय होईल. अहंकारानें, निर्बलतेने तो ग्रासलेला आहे. त्याचा नायनाट होऊन मानव संघटित होईल. तसेंच स्वतंत्र व शक्तिसंपन्न होईल. आज या गोष्टींची फार जरूरी आहे. मानवाच्या ठायीं सार्वत्रिक बंधुभाव निर्माण होऊन त्यापासून मिळणाऱ्या आनंदाचा तो भागीदार होईल. त्याच्यातील पाशवी वृत्ती नाहींशी होऊन तो पूर्णतया स्वतंत्र मानव होईल.

माताजींच्या आध्यात्मिक संसारांत जीं मुलें आज वावरत आहेत ती त्याच्याकडे या दैवी दृष्टीनें पहात आहेत. ती त्यांचें चालतें बोलतें दैवत आहे. माताजींच्या ठायीं कमालीची नम्रता आहे. मी अमूक करीन व माझ्या मुळें अमूक घडणारे आहे असें त्या केव्हांही सांगत नाहींत, परंतु त्यांच्या कार्यक्रमाचें हें थोडक्यांत स्वरूप आहे.

त्यानीं म्हटलें आहे कीं, "हें शरीर कीं ज्याला तुम्हीं मातेच्या नात्यानें ओळखता, त्या देहाला या गोष्टीची किंचित् जाणीव झाली आहे. तिच्याठायीं तसें कांहींच सामर्थ्य नाही. ती स्वेच्छेनें कांहींएक करूं शकत नाहीं. तो भगवान् सर्वशक्तिमान् आहे. तो कर्ता करविता आहे. इच्छा त्याची असेल तसें घडून येईल. सर्व करणारा व करवून घेणारा तोच आहे. मी कोणी नाही !"

चमत्कार करून दाखवावें व सर्व कारभार थोडक्यांत आटोपता घ्यावा या मताच्या माताजी नाहींत. त्यासाठीं त्यांचें अस्तित्व मुळींच नाहीं. त्यांना पक्कें माहीत आहे कीं, व्यक्तिमात्रामध्ये व जगामध्यें आध्यात्मिक क्रांति घडवून आणणें ही सहजसाध्य व सोपी गोष्ट नाहीं. त्याचा मार्ग फार लांब व कंटाळवाणा आहे. संकटें शिरोधार्य करीत त्या दीर्घमार्गानें वाटचाल करावयाची आहे. त्यांच्या दैवी शब्दामुळें व लिखाणामुळें तसेंच त्यांच्या कृती-मुळें नि प्रगट झालेल्या आशा आकांक्षांमुळें एवढेंच नव्हे तर आजवर जें कार्य

दृश्य स्वरूपांत पार पडलें आहे फार काय, आज त्या आमच्यांत वावरत आहेत व आम्हाला जें मार्गदर्शन करीत आहेत त्यामुळें त्यानीं आमच्यांमध्यें अशी श्रद्धा व विश्वास निर्माण केला आहे कीं, या जगांत दैवी शक्तीचें अस्तित्व निश्चितपणें आहे; ती शक्ति आमच्या विचारांना साकार करीत असते; आमचा भविष्य-काळ ती बनवीत असते.

आणि शेवटीं सांगावयाचें म्हणजे यापुढील काळांत स्वसंरक्षणासाठीं भारताला स्वतःच्या प्रयत्नांनीं फार महत्त्वाचा व उदात्त पुरुषार्थ गाजवून दाखवावयाचा आहे व तद्द्वारें अखिल जगापुढें एक उदात्त उदाहरण ठेवण्याचें भाग्य त्याच्या वाट्यास येणार आहे.

—


॥ श्री ॥

# निर्विकल्प व्हावे अंतकाळीं

शिल्पकार कुणी-फत्तर फोडतो
रूप तया देतो-विठ्ठलाचे ॥ १ ॥
फत्तराचे देव -तेहेतीस कोटी -
आम्ही स्वार्था पोटीं - निर्मियेले ॥ २ ॥
जीवनाचा अर्थ, स्वार्थाने लावितों -
अंतीं आठवतो - पांडुरंग ॥ ३ ॥
श्वास्वोच्छ्वासीं आम्ही -भरलों विकारे -
नवसाचे भारे - देवावरी ॥ ४॥
मर्त्य मानवाचा -कोण आटापिटा-
बेगडी प्रतिष्ठा - रक्षावया ॥ ५ ॥
पाउला पाउलीं - विठूची प्रेरणा -
तयाच्या चरणां - आठवावें ॥ ६ ॥
देह धर्म कर्म - आनंदे करावे -
मुखी आळवावें - हरीनाम ॥ ७ ॥
विठ्ठलाचे पायीं - विकल्प वहावे -
निर्विकल्प व्हावे - अंतकाळीं ॥ ८ ॥

# अधीन केलें मज तेणें

ले. : द. शं. टिपणीस



अधीन केलें मज तेणें. हें बाबा बोलले, पूजा करताना बाबा कोणालाही आपल्या कपाळावर गंध लावूं देत नसत. फक्त म्हाळसापतींना गळ्याला लावण्याची परवानगी होती. इतर भक्त पायाला गंध लावीत. आतां कल्पनेनें पहा. मशीदमाईंत भक्त वेष्टित बाबा सर्व पूजा करताहेत, डॉ. पंडित बघताहेत बाबांकडे. एवढ्यांत न कळे पंडिताना काय झाले.

त्यांनीं नूलकरांची गंधतबकडी हस्तगत केली. त्यांच्या जवळ पूजा-साहित्य नव्हते. ते केवळ दर्शनाला आले होते. बघता बघता डॅा. पंडितानीं बाबांच्या कपाळावर सुंदर त्रिपुंड्र रेखिला. भक्त घाबरले. आतां बाबा भयंकर रागावतील व एकच दणका उडेल. पण बाबांच्या शांत चेहऱ्यावर मोहक हास्य व तेज दिसूं लागलें. भक्तांना आश्चर्य वाटले. दुपारीं नूलकरांनीं बाबाना विचारले, "डॅा. पंडिताना कपाळाला गंध कसं लावूं दिलंत? आम्हाला मात्र बंदी, हा प्रपंच कां?" बाबा म्हणाले, —

"आपण मोठे पवित्र ब्राह्मण। हा जातीचा अपवित्र यवन।
कैसे करूं याचें पूजन। ऐसे न तन्मन शंकले॥ ६३ ॥
ऐसे मज त्यानें फसविले। तेथें माझें उपाय हरले।
नको म्हणणे जागीच राहिले। आधीन केलें मज तेणें॥ ६४ अ. ११॥

हें कसें? याचा अर्थ काय? विचार करूं या, बाबा सुचवतीलच.

## याचा अर्थ काय ?

सडकेनें सहज जात असावें. आपल्या समोर एकादा बैल वा कुत्रा जात असतो. मागून एकादा पोऱ्या धावत धावत येतो. व त्या बैलाला वा कुत्र्याला फटका देतो. आपण हटकलें, "कां रे बाबा, कां उगाच मारतोस?" तो उत्तर देतो, "कांहीं नाहीं आपलं सहज," व हंसत हंसत पुढें निघून जातो, पोरांचा हा सहजचा प्रयोग गाढवांवर तर सहज रीतीनें नेहमीच चालू असतो. कोणी घरीं आला आणि आपण विचारले, "काय, विशेष?" "नाहीं, आपलं सहज आलो." हा सहज शब्द आपण सहज रीतीनें वापरत असतो. जसा वापर सहज करतो तशी आपण सहज चांगली कृति केली तर काय बहार होईल. पण असें क्वचितच होते. सहज येतो, सहज जातो, सहज बसतो, उद्देश नाहीं, हेतू नाहीं, अर्थ नाहीं नि स्वार्थ नाहीं. पण एकादें कार्य सहज करतो हें दुर्मिळ. केलेच तर त्यांत उद्देश असतो, हेतू असतो अर्थ असतो नि स्वार्थ असतो. माणूस व निसर्ग यांत हाच मोठा फरक आहे. निसर्ग सहज करतो तर माणूस मुद्दाम करतो, सहज व मुद्दाम यांतील मुद्दाम नाहींसा झाला तर जग किती तरी पटीनें सुखी होईल.

पण सहज म्हणजे काय हें सहजासहजीं ध्यानीं येणें कठीण आहे. शब्दकोशांत सहज याचा कांहींही अर्थ दिला असो, पण अध्यात्मामध्यें त्याला विशेष अर्थ आहे, आणि तो शब्दानें स्पष्ट करणें कठीणही आहे. तांदुळ निवडणाऱ्याला खडे, पिचकणं, भातखंड यांचें ज्ञान पाहिजे, ती ओळखतां आली पाहिजेत. ती बाजूस केली कीं निखळ तांदूळ शिल्लक राहतो. तसेंच सहज समजण्यासाठीं मुद्दाम म्हणजे काय तें कळलें पाहिजे. तें बाजूला करतां आलें पाहिजे. म्हणजे राहील तें सहज. हेतुपुरस्सर करतो तें मुद्दाम. ज्यांत हेतू, उद्देश वा एकादी योजना आहे तें मुद्दाम. ज्या कृतींत आशा, आकांक्षा, वासना, विकार आहेत ती मुद्दाम. ज्यांत अहंकार व स्वार्थ आहे तें मुद्दाम. अहंकाराच्या हालचाली इतक्या छुप्या रीतीनें चालत असतात कीं पोलीस खात्यांतील हुषारांतल्या हुषार कुत्र्यालाही त्याचा वास येणार नाहीं मग माणसाचें तर राहोच. अमूक करायचें असें ठरवून आपण बहुतेक गोष्टी करीत असतो. आपली मानसिक यंत्रणा इतक्या सूक्ष्म रीतीने कार्य करीत असते कीं तिच्या पुष्कळ हालचाली आपल्याला समजत नाहींत. चंद्रावर झेप घेणाऱ्या अवकाशयानांतील यंत्रणा कितीही गुंतागुंतीची असली तरी ती या मानसिक यंत्रणेच्या गुंतागुंतीपुढें फिकीच ठरेल. कित्येक गोष्टी आपण करतो पण त्या कां केल्या असे विचारल्यास आपणास कांहीं सांगता येत नाहीं. अशा वेळी उगाच सहज असे म्हणून वेळ मारून नेतो. पण असे मात्र नसतें. कर्त्याला जाणीव नाहीं असें एकादे सूक्ष्म कारण वा हेतू त्या कार्यामागे असतोच. राजकारण तर मुद्दामाचें आगर; त्यांत कित्येक गोष्टी मुद्दाम घडवून आणल्या जातात. लोककल्याणाच्या ज्या कांही गोष्टी केल्या जातात त्यांत केवळ लोककल्याण एवढाच उद्देश नेहमी असतो असे नाहीं तर पडद्यामागे कीर्ति, किताब, मानमरातब कित्येक वेळां हजर असतात. भावाचे चढउतर यांत निसर्गापेक्षां व्यापाऱ्यांचाच हात जास्त असतो. ते मुद्दाम चढविले व उतरविले जातात. इतर क्षेत्राकडे पाहिलें तर सर्वत्र हेंच दिसून येईल कीं मानासाठीं, पैशासाठीं, कीर्तीसाठीं, स्वार्थासाठीं बहुतेक सर्व गोष्टी केल्या जातात. या सर्वांपाठीं सर्वांना खेळवणारा अहंकार असतो. ज्यायोगें आपलें पोषण होईल, आपल्याला आनंद होईल, मग इतरांना दुःख झालें तरी चालेल, अशा गोष्टी मानवाकडून अहंकार करवून घेत असतो व तो तें इतक्या

कुशलतेनें करतो कीं कर्त्याला त्याची यत्किंचितही जाणीव होऊं शकत नाहीं. अहंकार म्हणजे पडद्यामागील व्यक्ति. कळसूत्री बाहुलीप्रमाणें तो मानवाला नाचवीत असतो, अशा प्रकारें ज्या कार्यामागें अहंकार आहे तें मुद्दाम होय. जें मुद्दाम तें दुःख निर्माण करणारें असतें.

## मुद्दाम नाहीं तें सहज

जें मुद्दाम नाहीं ते सहज. वर दर्शविलेल्या गोष्टी ज्यांत नाहींत असें जें कार्य तें सहज. ज्यांत हेतू नाहीं, उद्देश नाहीं, अर्थ नाहीं नि स्वार्थ नाहीं तें सहज. यांत कर्त्याला आपण काय करतो याची जाणीव नसते. अमूक एका व्यक्तीसाठीं असें त्याचें करणें नसतें. स्वतःचें च दुसऱ्याचें असा भेद नसतो. जें करतो तें सहज आत्म्याच्या प्रेरणेनें करतो. मुद्दाम करण्यांतील आनंद हा स्वार्थी असतो. अहंकाराला खूष करणारा असतो. सहजतेनें होणारा आनंद हा आत्मानंद असतो. आत्म्याला खूष करणारा असतो. त्यामुळें अप्रत्यक्षपणें सहज कृति सर्वांना आनंद देणारी असते. लहान बालक भुईभिंगरी गरगर फिरताना पाहून आनंदानें टाळ्या वाजवतें. त्याचा तो आनंद सहजानंद व तो आनंद त्यानें टाळ्यांच्या रूपानें व्यक्त केला. त्या टाळ्या म्हणजे सहज कृति. ती पाहून इतरांनाही गंमत व आनंद वाटतो. आर्त किंकाळी ऐकून क्षणाचाही विलंब न करतां आगीत घुसून त्या संकटग्रस्ताला जीवदान देणाऱ्याची कृति ही सहज कृति. बुडणारा दिसताच मागें पुढें न पहातां, व्यक्ति कोण हें लक्षांत न घेतां, पाण्याची खोली वा ओढ ध्यानीं न घेतां पाण्यांत धाडकन उडी टाकून बुडत्याला वाचविण्याची त्या शूराची कृति ही सहज कृति आहे. सहज कृतीचें साईचरित्रांतील हें उदाहरण पहा. कोणाएका गांवीं कोणा एका बाईचें मूल भट्टींत पडले. बाबाना हें कळलें. त्यांनीं तें मूल वरच्यावर झेललें व बाहेर काढलें. त्या तंद्रींत बाबांनीं आपला हात धुळींत खुपसला व तसेंच बसून राहिले. ही सहज कृति. दुसरें उदाहरण मावशीबाईचें. ती ज्या पद्धतीनें बाबांची सेवा करीत होती, त्या पद्धतीला कांहीं भक्तांनीं विरोध केला. बाबांना हें आवडलें नाहीं. हें दर्शविण्यासाठीं त्यांनीं पोटांत सटवा खोलवर खुपसून घेतला. बाबांच्या सेवेमुळें होणाऱ्या आनंदाच्या तंद्रींत तिची सेवा चालू होती. बाबांना त्रास होतो न होतो हें तिच्या गांवीही नव्हतें. मावशी-

बाईची ही कृति म्हणजे सहज वृत्ति, सहज सेवा, सहज भक्ति. सहज ही क्षणार्धांत एकाएकी येणारी ऊर्मि आहे. मात्र त्यांत वासना विकार असतां कामा नयेत. सहज कृतीनें आत्मा फुलतो व अहंकार मरतो. मुद्दाम केलेल्या कृतीनें अहंकार फुलतो व आत्मा मलिन होतो. निसर्गामध्यें सहज कृति दिसूं शकते. निसर्गांत जें जें घडतें तें सहज घडतें. सहजमध्यें कारण नसते असें नाहीं. कारणाशिवाय कार्य नाहीं हा शास्त्रीय सिद्धांत आहे हें खरे स्वार्थ अहंकाराखेरीज कोणतेही कार्य व्हावयाचें नाहीं हेंही खरें. परंतु स्वार्थास्वार्थामध्यें कांहीं फरक आहेच कीं नाहीं. विश्वकल्याण करायला लावणारा स्वार्थ व स्वतःचे खिसे भरावयास लावणारा स्वार्थ यांत कांहींच का फरक नाहीं ? व्यवहारांत विवेक पाहिजे आणि व्यवहाराशिवाय अध्यात्म नाहीं. म्हणून अध्यात्मांतही विवेक पाहिजे. सारासार-विचार-शक्ति पाहिजे. नुसत्या एकाच तत्त्वाला चिकटून कांहीं व्यवस्थित होत नाहीं. हें विश्व अनेक तत्त्वांच्या तंतूनीं विणलेलें असल्यामुळें सर्वांचा समन्वय साधणें आवश्यक आहे. सहज मागें कारण असेल पण तें कारण कोणत्याही स्वार्थी हेतूनें प्रेरित नसतें. नैसर्गिक रीत्या ती गोष्ट घडत असते. झाडांना फुले व फळे येतात. फुले व फळें निर्माण करण्यांत झाडांचा कांहीं हेतू असतो कां? नैसर्गिक रीत्या ती गोष्ट होते. ती सहज क्रिया आहे. अमक्यांनाच मिळावा म्हणून कां फुलांना सुगंध येतो? कांहीं लाभ व्हावा म्हणून कां ती उमलतात ? फुलें, फळें, धान्य जें उत्पन्न होते ते अमक्यासाठींच असा का त्यांचा उद्देश असतो ? आपापसांत वाटणी करून त्यांच्यावर मालकी हक्क मानवानें प्रस्थापित केला आहे. कारण मानवाच्या ठायीं जेवढा अहंकार आहे तेवढा इतर सजीव वा निर्जीव सृष्टींतील कोणाच्याही ठायीं नाहीं. मुळामध्यें निसर्गाची कृति अमक्यासाठीं अशी नसतेच. अशीच सहजकृति असते. कोणत्याही कृतींत आपल्या मनाच्या पुसट कां होईना पण पडच्छाया आल्या तर ती कृति सहज राहत नाहीं. सहज मध्यें त्रास नाहीं, कीं सुख दुःख नाहीं.

## मानवाकडून सहज कार्य कां होत नाहीं ?

निसर्गाचें कार्य त्याची जी अंतर्गत शक्ति, विश्वशक्ति तीस

अनुसरून होत असतें म्हणून तें सहज असते. मानव मात्र आपल्या या अंतर्गत शक्तीस अनुसरून क्वचितच कार्य करीत असतो. म्हणून त्याच्या कडून सहज कार्य सहसा होत नाहीं. माणसाला मन म्हणून कांहीं आहे. आपल्या मानसिक प्रवृत्तीस अनुसरून मानव कार्य करीत असतो. हें मन चैतन्याला, आपल्या आत्म्याला झाकून टाकते. मनाला इच्छा, वासना, विकार असल्यामुळें त्यांच्या योगे आत्मतेज झाकलें जातें. मनावर अहंकाराची छाप अधिक असली कीं मन आपल्या वृत्तीप्रमाणें मानवाकडून कार्य करवून घेते. चैतन्याला मागे सारून अहंकार सर्वाधिकार आपल्या हातीं घेतो व त्यामुळें इच्छा; वासना, क्रोध, लोभादींची भाऊगर्दी मनांत होते. मग माणूस सहज प्रवृत्तीच्या योगानें नव्हे तर मनःप्रवृत्तीच्या योगानें कार्य करतो. असें असे तोंपर्यंत माणसाच्या हातून सहज कार्य होणें नाहीं. तें होण्यास अहंकाराचे सर्वाधिकार काढून घेऊन तें ज्याचें त्यास म्हणजे आपल्या आत्म्यास चैतन्यास दिले पाहिजेत. नोकरानें राज्य बळकावलें आहे. राजाला अज्ञानाच्या अंधार कोठडींत कोंडून ठेवलें आहे. ही कोठडी फोडून, अज्ञान नाहींसे करून राजाला मोकळे केले पाहिजे. या पदच्युत राजाला हृदयसिंहासनावर पुन्हां स्थापन करणें जरूर आहे व तोतया राजाला पुन्हां त्याचें नोकराचें स्थान देणे जरूर आहे. या तोतयाला खेचून योग्य स्थानावर आणलें कीं मनांतील भाऊगर्दी आपोआप कमी होईल. मन आत्मतेजानें प्रकाशित होईल व मग मानवाकडून सहज कार्य होऊं लागेल. परंतु ही क्रांति घडवून आणणें महा कठिण आहे. त्या साठीं अनेक साधने अध्यात्मांत सांगितलेली आहेत. नाना प्रयत्न खटपटी करून व कष्टमय जीवन सहन करून मानवाने त्यांचा उपयोग केला तर ही क्रांति होऊं शकते. अनेक मानवांनी अशी क्रांति आपल्या अंतरंगांत घडवून आणली आहे व मानवाचे देव झाले आहेत. स्थितप्रज्ञ झाले आहेत. ज्ञानेश्वर एकनाथादि सर्व संत मंडळी या कोटींतील होत. त्यांनीं जें जें कांहीं केलें ते सहज केलें. त्यांचा अहंकार इच्छा वासना वगैरेंचा क्षय होऊन चित्त शुद्ध झालें होते. शुद्ध चित्तच सहज कार्य करूं शकते. म्हणून चित्तशुद्धीच्या साधनांचा होईल तेवढा वापर आपण आपल्या रोजच्या व्यवहारांत केला पाहिजे.

## अंतर्गत क्रांति सर्वांत जबरदस्त

आजपर्यंत ज्या कांहीं क्रांत्या झाल्या असतील त्यांत आपल्याला जी कांहीं अंतर्गत क्रांति करावयाची आहे ती सर्वांत जबरदस्त आहे. कारण अहंकाराशीं आपली गांठ आहे. त्याच्या इतका जबरदस्त व सामर्थ्यशाली जगज्जेता अजून कोणी झाला नाहीं. गनिमी काव्याच्या लढाईंत अहंकार इतका कुशल दुसरा कोणी या पृथ्वीतलावर मिळणार नाहीं. म्हणून आपल्या क्रांतिसाठीं मिळेल त्या सर्व साधनांच्या समावेश आपण आपल्या सैन्यांत केला पाहिजे. या कामीं कर्म म्हणून ज्याला म्हणतात त्याचा, मनांत आणलें तर, आपल्याला उपयोग करून घेतां येईल. या क्रांतीत कर्माचा वाटा मोठा विलक्षण असतो. आपण त्याला आपल्या बाजूला घेतले तर तो आपणास साहाय्य करील. नाहींतर सरळ अहंकाराशीं हात-मिळवणी करील. कर्म अहंकाराच्या वर्चस्वाखालीं असले तर आपल्याला कधींच जय मिळणार नाहीं. म्हणून त्याला सतत आपल्या बाजूला आपण ठेवलें पाहिजे. चांगली कर्में ही चित्तशुद्धिकारक असतात. ती आत्म्याचे पोषण करणारी व आत्मतेज फुलवणारी असतात. अहंकाराला हळूहळू खच्ची करणारी असतात. उलट वाईट कर्में अहंकार व त्याचे साथीदार यांचें पोषण करतात. यास्तव आपण सदैव चांगली कर्में करीत राहावे. भूतकाळांत जीं कांहीं कर्में आपण केली असतील त्यांची बरी वाईट फळें आपणाला या जन्मीं भोगली पाहिजेत. त्याबद्दल दुःख वा आनंद दोन्ही करण्यांत अर्थ नाहीं. आपलें दुःख आत्म्याच्या आनंदाला मारक असतें. दुःखामुळें आपले शरीरच नव्हे तर अंतर्गत सर्वयंत्रणा मंदावते. दुःखी कष्टी माणसाला अन्न गोड लागत नाहीं. तसेंच कोणत्याही कार्यांत गोडी वाटत नाही व मन उदासवाणे होते. आनंदाचाही उपयोग नाहीं. कारण अशा आनंदांत आपल्या कर्मामुळें तो मिळाला ही जाणीव असते. यामुळें तो आत्म्याचा आनंद न होतां अहंकाराचा आनंद होतो. म्हणून चांगलें घडले तर मी ( अहंकार ) केलें व वाईट घडले तर नशिबामुळें वा दुसऱ्यामुळें असें आपण नेहमीं म्हणत असतो. क्रिकेटच्या खेळांत एकाद्या फलंदाजानें शतक काढले तर तो तें आपलें कौशल्य समजतो. लोकही त्याला तशीच साथ देतात. पण जेव्हां तो शून्यांत उडतो तेव्हां मात्र Cricket is a

game of chance. शतक काढले तेव्हां मात्र chance कुठें तरी रजेवर गेलेला असतो. अशी ही सर्वच कार्यात अहंकाराची गमतीची टोलवाटोलवी चालू असते. यास्तव गतजन्मींच्या फलाबद्दल आनंद वा दुःख करीत न बसतां या जन्मीं सदैव चांगली कर्मे म्हणजे दुसऱ्याचें जीवन पोसणारी, कल्याण करणारी, नीतिवर्धक व सद्गुण पोषककर्में करण्यांत आपण सदा रत असावे. अशीच कर्मे व त्यांची फले आपलें चित्त शुद्ध करण्यास, आत्मतेज फुलविण्यास उपयोगी पडतात व अंती आपल्याला सहजक्रिया करण्याची शक्ति प्राप्त करून देतात.'

## कर्तव्याचें एकनिष्ठपणें पालन

आपल्या रोजच्या जीवनांतील लहान सहान कर्मे आपल्या हातून सहज होतील अशी संवय प्रथम आपण स्वतःस हळू हळू लावून घेतली पाहिजे. घरांत जाता येता वाटेंत पडलेली वस्तू व्यवस्थित ठिकाणीं ठेवणें, कोणी पडेल असं कांहीं वाटेंत (घरीं दारीं) असेल तें दूर करणें, आपलें एकादें लहानसे काम करण्यास घरांतील कोणी व्यक्ति विसरली तर न बोलतां तें करून मोकळे होणें, अमुकसाठीं तट्नट् न बसतां काम भागवून घेणें वगैरे गोष्टी नमुन्यादाखल. कोणतीही गोष्ट करतांना तसें करणें हें आपलें कर्तव्य कर्म आहे या भावनेने करीत राहिले पाहिजे. कर्तव्य करणें म्हणजे सहज गोष्ट करणें मात्र नव्हे. कारण कर्तव्य करतो यामध्ये का करतो, कसें करतो, कोणासाठीं करतो हें सर्व भाव असतात, असें असलें तरी कर्तव्य करीत राहिल्यानें संवयीमुळें कर्तव्यनिष्ठा हा भाव अध्यात्मांत अति महत्त्वाचा आहे. मी जें कांहीं शिकलो व मला जी कांहीं शक्ति मिळाली आहे त्याचा उपयोग कुटुंबियासाठीं करतां करतां मानसिक व शारीरिक आपणास अधिक उपयोगी पडेल, असें कांहीं नवीन शिकावयाचे, करावयाचे या उद्देशानें संसार करीत राहिल्यानें हळू हळू अहंकार फिका होत राहील व सहज प्रवृत्ति अधिकाधिक वाढीस लागेल.

संसारामुळें निर्माण होणाऱ्या व्यवहारांत आपणांस हरतऱ्हेच्या गोष्टी रोज कराव्या लागतात. कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय म्हणून कांहीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या आपल्यावर असतात. या जबाबदाऱ्या पार पाडतांना 'आतां आलंच

वाट्याला तर केलें पाहिजे' अशी वृत्ति असूं नये. मी सर्वांत वडील यास्तव माझ्यापेक्षां लहान असलेल्यासाठीं, त्यांच्या कल्याणासाठीं मी चार गोष्टी कराव्यात व कष्ट काढावेत हें साहजिक आहे. अशा दृष्टीनें सर्व गोष्टी शांतपणे पार पाडीत राहावें. यायोगे अंतःशुद्धि होण्यास चांगली मदत होईल. "काय करावें ? बाप आहे ना ? पोसलंच पाहिजे पोरांना." असं चिडून संतापून केलेल्या कर्तव्याला चांगली फळें येणार नाहींत. असला संताप वा वेडेवाकडे बोलणें या योगें आपली अंतःशुद्धता होणार तर नाहींच पण मुळांत कांहीं थोडी फार शुद्धता असली तर ती मलिन मात्र होईल. संसार कितीही दुःखाचा असला तरी आपला आपणच निर्माण केला आहे. देवानें न्हे. आपलें कर्म आहे ते शांतपणें भोगणें हें उत्तम यास्तव आपली कर्तव्यें, न चिडता वा न रागावता, होतील तेवढी दुसऱ्याचें कल्याण करण्याच्या हेतूने करीत राहावी. दगडाची ठेंच लागली तर अडाणी लोक चिडून त्या दगडाला दोन चार शिव्या हासडतात. अशी वृत्ति असूं नये. शांतपणा साधला कीं जें कांहीं करतो तें मी करतो व दुसऱ्याच्या कल्याणाकरतां करतो ही भावना हळू हळू टाकून द्यावी. जें करतो ते देव करतो. देव माझ्याकडून करवून घेतो. माझेंच मला जिथें कल्याणाकरतां येत नाहीं तिथें मी दुसऱ्याचें कल्याण करणार कोण ? 'मी' मध्ये मध्ये डोकावू लागला तर वरील प्रकारचा प्रश्न स्वतःला विचारीत राहावे. या योगे हळू हळू मनांतला 'मी' मावळत जाईल, मी करतो, मी केलें, माझ्यामुळें झाले अशी अहंता लौकरच नाहीशी व्हावी म्हणून सदैव देवाकडेच लक्ष ठेवावे. यासाठीं भक्तीचा अंगिकार करावा. जें चांगलें त्याचें ग्रहण करावें व वाईट त्याकडे दुर्लक्ष करावे. ताकद असेल तर तें सुधारण्याचा प्रयत्न करावा, नाहींतर वाईटापासून अलिप्त राहावें. या सर्व गोष्टी सतत करण्याचा प्रयत्न करीत राहिल्यानें अशी एक अंतःसंवय निर्माण होईल कीं जिच्या योगें तुमच्या हातून चागलेच घडत राहील. मग कोठें कांहींही चांगले करण्यासारखे दिसलें कीं माणूस मागें पुढें न पहातां झटून तें करील. मोटारपुढें आलेलें मूल ना गोत्यातला ना नात्यांतला असा एकादा जाणारा पटकन पुढें होऊन त्या मुलाला ओढून बाजूला करतो ते या अंतःसंवयीमुळें ही संवय एकदां अंगवळणीं पडली कीं मग आपल्या हातून प्रत्येक कृति सहज होईल. सहज साधण्यास सूक्ष्म दृष्टी व तल्लख बुद्धि लागते. असा माणूस कोठेही गेला

तरी नुसत्या दृष्टिक्षेपांत कोठें कशाची जरूरी आहे हें ओळखून ते करून तो मोकळा होतो व कार्य झाल्यावर आपण जणूं कांहीं त्या गांवचे नाही अशा भावानें तो दुसऱ्या गोष्टीकडे वळतो. कोणतीही लहान मोठी गोष्ट सहज करण्याची ही हातोटी अध्यात्मांत अत्यंत उपयुक्त आहे. आपल्या आध्यात्मिक साधना व भक्ति ही मानवता व सर्वांभूतीं परमेश्वर यांवर आधारलेल्या असल्या तर ही हातोटी साधूं शकेल.

### नैवेद्य उष्टा झाला ?

घरोघरीं घडणारे नित्याचें उदाहरण पहा. सणाचा, पूजेअर्चेचा दिवस स्वयंपाक तयार झालेला. बहुधा भलताच उशीर. घरांतील बालबालके भुकेनें व्याकुळ झालेली. देवाचा नैवेद्य वाढून तयार. भुकेलें बालक अधीरतेनें पहात असते. न राहून हळूच लाडू उचलते झालें. नैवेद्य उष्टा झाला एकच हाकाटी. बालकाला चापटा चापटी. लाडू हिसकावला जातो. रडतो बिचारा. दुसरा लाडू येतो. डोळे मिटून देवाला नैवेद्य दिला जातो. पण देवानेही डोळे मिटलेले असतात. देवाच्या तोंडांत घास जात नाहीं. कसा जाईल ? एका हातानें नैवेद्य व दुसऱ्या हातानें त्याला चापट्या. (हें होऊं नये म्हणूनच दुसऱ्या हातानें डोळे झाकण्याची पद्धत आली कीं काय ना कळे !) नैवेद्य उष्टा झाला म्हणे. अहो, देवानें खाल्ला तो काय उष्टा झाला ? खरा नैवेद्य आधींच झाला. भुकेल्याला आधीं द्यावें असें बाबा सांगतात; आणि आम्ही चापट्या मारतो. अशी ही आमची भक्ति. तरी बरं तर्खडकर बाईचें दाखले साई सच्चरित्रांत आहेत. वर्षानुवर्षे वाचतो, पण शेवटीं काय जाऊं द्या. ओलाव्या शिवाय रोपटें नाहीं; ममतेशिवाय भक्ति नाहीं. असे आम्ही. आणि शबरी बघा, प्रत्येक बोर उष्टे करून तिनें रामाला दिले. रामानें ते कौतुकानें खाल्लें. कां ? तर माझ्या रामाच्या मुखांत वाईट बोर जाऊं नये म्हणून ही तिची भावना हे सहजपणे घडलें. ही सहजभक्ति. राम भुलला व बोरे खाल्ली. आणि तो नामदेव. देवाच्या मागे लागला जेव म्हणून. देव जेवीना, 'जेव ना रे, देवा' असें तो काकुळतीनें म्हणाला. देव भुलला व जेवला. त्यांत नाम्याला काय मिळाले ? धन संपत्ति, कीं बढती कीं पद्मभूषण ? देव जेवला यांतच आनंद, अशी ही सहज भक्ति. आनंद हीच अपेक्षा, त्या अमृत आनंदाच्या पोटीं ती निर्माण होते. शुद्ध चित्तांत सहज भक्तीचा उगम

होतो. सदाचार चित्त शुद्ध करतो. Practice makes a man perfect हें तत्त्व येथेंच नव्हे तर सर्व अध्यात्माला लागू आहे. हें व्हावें म्हणून धार्मिक आचारांचा आटा पिटा, कर्मठपणा करा, सोंवळे ओवळे धरा, उपवास, व्रते करा. कांहीं करा पण ध्यानीं ध्या कीं वरील तत्त्व प्रत्यक्षांत आणण्यासाठीं अध्यात्माचा जन्म झाला आहे. सदाचार व सुविचार यांचे महत्त्व विसरून खूप करण्यापेक्षा खरा नास्तिक अधिक लौकरच तरेल.

## सहज भक्तीचें महत्त्व

आपली भक्ति ही सहज भक्ति झाली पाहिजे. चंद्राला पाहून समुद्राला भरती येते व कुमुदिनी फुलते तसे आपल्या देवाला पाहून, त्याचें नाम ऐकून, त्याच्या लीला ऐकून आपल्या भक्तीला आपल्या न कळत भरती आली पाहिजे. मनाचें कमळ फुललें पाहिजे. भरती व फुलणें हें जसें सहज होते तशा आपल्या सर्व उपासना व्हाव्यात. सहज याचा अर्थ सुरवातीस विस्तारानें स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे खरा पण तो अपुरा पडणार याची जाणीव ठेवूनच केला आहे. अव्यक्ताचें व्यक्तांत येणें ही सहजक्रिया आहे, कां कसें हें कोणासच शब्दांत धड व्यक्त करतां येत नाहीं, स्पष्टीकरणा-पेक्षां अनुभवानेच ती गोष्ट कळू शकते असेंच सहजचें आहे. सहज ही मूळ ब्रह्माची क्रिया आहे. ही जी मूळ क्रिया कीं जिच्यामुळें हा सर्व पसारा निर्माण झाला तीच भक्ति, भक्ति ही शिवशक्ति आहे, एकनाथानीं सहज हा शब्द वापरून ही गोष्ट स्पष्ट केली आहे. एकनाथ म्हणतात– सहज माझी प्रकाश स्थिति, ते भक्ति बोलिजे सहज ॥ हें भक्तीचें स्वरूप आहे. हा सहजपणा संसारांत वावरतांना आपण साध्य करून घेण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे. यासाठी निष्काम कर्मयोगानें प्रत्येक कार्य करण्याची आपण संवय लावून घेतली पाहिजे. सर्वांभूतीं परमेश्वर पहाण्याची दृष्टी असल्याखेरीज निष्काम कर्मयोग साध्य होणें कठीण. सहजकाय, निष्काम कर्मयोग काय, वा सर्वांभूती परमेश्वर पहाणें काय या सर्व गोष्टी एकमेकांस पूरक आहेत. भक्तींत या सर्वांचा अंतर्भाव होतो. ब्रह्माचा सहज प्रकाश म्हणजे भक्ति असें एकनाथांना वाटते, तर सर्वांभूती भगवद् भावो या नाव मुख्य भक्ति पाहो। असें ज्ञानेश्वरांना वाटते, भक्ति ही केवळ भजनांत, कीर्तनांत वा नामस्मरणांतच गुंग होऊन न राहतां ती संसारांत

उतरली पाहिजे व सहज रीतीनें सर्व कार्यांत वावरली पाहिजे. माळेंतील मणी निराळे राहूनही एका सूत्रांत बद्ध झालेले असतात. तसें संसारांतील नानाविध कृती भक्तीच्या सूत्रांत गोवलेल्या असल्या पाहिजेत. प्रपंच व परमार्थ हे दोन व्यवहार असले तरी सहज भक्तीच्या सूत्रांत ते एकत्र गोवता आले तर त्यांचा सुंदर मिलाप होऊन ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधेल.

डॉ. पंडितांनीं केलें ते सहज केलें. म्हणून बाबा भुलले. अशाच भक्तीनें देव भुलतो. व भक्तांचे लाड पुरवतो. म्हणूनच बाबा म्हणाले 'अधीन केलें मज तेणें.'

—

# साई-कृपा

(श्लोक)

(१)

साँई! तुझें नाम सुधाच साच।
ती सेवितां मूळ तुरे भवाचं॥
साँई! जगाचा प्रभु तूंच कर्ता।
भर्ता नि हर्ता सुख-शांति-दाता॥ १॥

(२)

साँई सुखाचाचि समुद्र गोड।
तेथें नसे भीति, जया न जोड॥
पोहा तिथें मज्जन ही करा हो।
तारा तरा आणिक धन्य व्हा हो॥ २॥

(३)

साँई गमे सूर्यचि अद्वितीय।
जो स्वप्रकाशी श्रुति-शास्त्र-गेय॥
नास्तोदया वाव तमा मुळींच।
तो ताप-पापघ्न परेश साच॥ ३॥

(४)

साँई सखा निष्कपटी विशुद्ध ।
संसिद्ध सिद्धिप्रद शांत बुद्ध ॥
बोधें करी मुक्त हरी त्रितापा ।
दावी दयेनें परमार्थ सोपा ॥ ४ ॥

(५)

शिर्डी – पुरीची करितांच वारी ।
साई सुखें संकट सर्व वारी ॥
देहींच दावी सुखकंद रामा ।
नाशोनि दुःखा करि पूर्ण कामा ॥ ५ ॥

(६)

साँई ! तुझा तूं न दुजें जगीं या ।
भासे दुजें, तो भ्रम चित्ति वायां ॥
आहेसि गा तूं नभसा अखंड ।
मानी भ्रमें जीव जगासि खंड ॥ ६ ॥

(७)

अज्ञान-योगें तनु मीच मानी ।
हा जीव तेणे बहु होय हानी ॥
साँई-कृपेनें भ्रम-नाश होई ।
साँईच भासे मनिं सर्वठायीं ॥ ७ ॥

(८)


— प्रार्थना —

साँई ! असे मी बहु मूढ मानी ।
आतां कृपेनें करिं तूं अमानी ॥
चित्तीं दुजा भाव नसो कदा गा ।
साई प्रभो ! त्वत्पदिं देइं जागा ॥ ९ ॥

कवी— रा. ब. खाडिलकर
वकील, नाशिक.

# श्रीगजानन महाराज शेगांवकर

( लेखक : श्री. रमेशचंद्र पु. कुळकर्णी )



**श्रीगजानन महाराज शेगांवकर**

महाराष्ट्रापुरतेंच बोलायचे झाल्यास ही भूमी अनेक संतांच्या वास्तव्यानें पुण्यपावन झाली आहे. महाराष्ट्रांतील कोणताही जिल्हा किंवा तालुका घ्या. तो भाग सत्पुरुषाच्या वास्तव्यानें पुण्यपावन झालेला आहे.

वऱ्हाडांत शेगांव या नावाचें एक लहानसें खेडें मुंबई—नागपूर मार्गावर व खामगावांपासून जवळच आहे. त्या गावीं सुमारें साठ वर्षांपूर्वी सप्टेंबर महिन्यांत ( ता. ८। ९।१९१० ) श्रीगजानन महाराज समाधिस्थ झाले.

६०।७० वर्षांपूर्वीं कोपरगांव जवळचें शिरडी हें गांव कोणाला फारसें माहीत नव्हते. त्या गावीं श्रीसाईबाबा अवतीर्ण झाले आणि त्या गांवाचा लौकिक वाढला व उत्तरोत्तर वाढत चालला आहे. तोच प्रकार शेगांवचा. शेगांवलाही उत्तरोत्तर वाढतें महत्त्व येऊं लागलें आहे.

## श्रीसाईबाबा व श्रीगजानन महाराज

श्रीसाईबाबा आणि श्रीगजानन महाराज यांचे अनेक बाबतीत साम्य असलेले आढळून येतें. श्री साईबाबा मूळ कुठचे, त्यांचा जन्म कधी व कोणत्या आईबापांच्या घरीं झाला हें जसें आजवर निश्चितपणें कोणी सांगू शकले नाही, तोच प्रकार आहे श्री गजानन महाराजांचा. साईबाबानीं आपला कोणी शिष्य किंवा शिष्यपरंपरा निर्माण केली नाही. त्याचप्रमाणें श्रीगजानन महाराजानींही शिष्य या नात्यानें कोणाची नियुक्ति केली नाहीं.

परदुःखनिवारण हेच होतें दोघांचेही अवतार कार्य. इतर साधुसंता-प्रमाणें साईबाबानीं मार्गदर्शनपर असे अभंग, ओव्या वगैरे काव्यनिर्मिती केली नाहीं. तसेंच आहे श्रीगजानन महाराजांचें.

दोघांनींही आपल्या हयातींत सहजासहजीं असंख्य चमत्कार केले. श्रीसाईबाबांची समाधी जशी त्यांच्या एकनिष्ठ भक्तांस पात्रते तोच प्रकार आहे शेगांवच्या श्रीगजानन महाराजांचा.

## कांहीं आश्चर्यकारक घटना

अशा या थोर व साक्षात्कारी संताच्या जीवनांतील कांहीं आश्चर्यकारक घटनांचा येथें परिचय करून देण्याचें कारण, गेल्या महिन्यांत मी कांहीं व्यावसायिक कामानिमित्त नागपूरास गेलों असतां तेथून खामगांवास आलों. तेथें शेगांवच्या संताच्या अर्थात श्रीगजानन महाराजांच्या गोष्टी ऐकल्या व त्यांच्या वास्तव्याने पुण्यपावन झालेलें तें गांव तेथून जवळच म्हणजे ७।८ मैलांवर असल्याचे समजलें. मनानें तिकडे जाण्याची ओढ घेतली व देवकृपेनें ती पूर्णही झाली.

श्रीगजानन महाराज हे शेगावांत सुमारें नव्वद वर्षांपूर्वीं एकाएकीं अवतीर्ण झाले. प्रथम त्यांना लोकांनीं पाहिले तें अत्यंत भिकार व गलिच्छ स्वरूपांत. त्या

गावांत साधु देवीदास यांचा एक मठ आहे. त्या मठांत अन्नदान होत असे. भोजनावळी झाल्यानंतर उष्टया पत्रावळी बाहेर उकिरड्यांत फेकून दिल्या जात असत. त्या पत्रावळींतील अन्न निवडतांना तेथील लोकांनीं या महापुरुषाला प्रथम पाहिलें. कसें तरी वागायचें, कांहीं तरी व कधी तरी भक्षण करायचें, कुठें तरी लोळायचें हा त्यांचा नित्याचा कार्यक्रम! हा कोणी तरी वेडापिसा आहे अशी झाली होती सर्वांची समजूत. ती तशी व्हावी व आपल्या वाऱ्यास कोणी उभे राहूं नये म्हणून ते कदाचित तसे वागत असतील. कांहीं संतांची वागण्याची ती एक पद्धत असते. रस्त्याला बाजूला डोहांतून किंवा पिंपांतून पाणी भरून ठेवलेलें असायचें. तहान लागली असता तेंच पाणी ते प्यायचे! मग लोकानीं त्यांना पिसाट, कां म्हणूं नये?

परंतु असें असलें तरी अशा पुरुषांचें साधुत्व कांहीं लोकांच्या दृष्टीने दडून रहात नाहीं. त्यांना त्यांची ओळख पटतेच.

शेगांवला त्यानीं नंतरच्या काळांत नाना चमत्कार केले. तेथें वंकटलाल व दामोदर या नावाचे दोन संपन्न परंतु भगवद्भक्त गृहस्थ होते. त्यानीं महाराजांस आपल्या घरीं आणून त्यांची सेवा शुश्रूषा केली. तेथें पितांबर या नावाचा एक भक्त त्यांच्याकडे येत असे. त्याच्या हातीं पोखरलेला भोपळा देऊन महाराजांनीं त्याला जवळच्या एका नाल्यावर पाठविलें. महाराज त्याला म्हणाले, अरे! हें बघ; मला फार तहान लागली आहे. या भोपळ्यांतून त्या नाल्यांतील पाणी घेऊन ये. पण लक्षांत ठेव. पाणी ओंजळीनें भरावयाचें नाहीं. भोपळाच पाण्यांत बुडवायचा आणि तो भरून आणायचा.

पीतांबर गेला त्या ओढ्यावर, पहातो तर काय? भोपळा बुडविण्या-इतकें त्या ओढ्यांत पाणी नव्हतें. ओंजळीनें भरावें तर महाराजांची तशी आज्ञा नव्हती. मग त्यानें काय केले? त्या भोपळ्याचा पाण्याला स्पर्श होतांच नाल्यांतील पाणी वाढलें व भोपळा बुडवून भरपूर पाणी घेतां आलें!

## विस्तवाशिवाय चिलीम ओढली

एके दिवशीं सकाळीं महाराजांस चिलीम ओढायची होती. आगपेटीतील काड्या संपल्या होत्या. जवळ होता जानकीराम सुवर्णकार. तो सकाळच्या रामपारी आपल्या बागेसरींतला विस्तव द्यायला कुरकूर करूं लागला!

## गावांतील दोन भक्त

महाराज म्हणाले ठीक आहे ! मी विस्तवाशिवाय चिलीम पेटवीन आणि फुंकर मारतांच चिलमींत अंगार पेटूं लागला. साई बाबांना पणत्या पेटविण्यांचा छंद होता. एके दिवशी शिरडीतील दुकानदारांनी तेल देण्याचें नाकारतांच त्या पणत्यांत पाणी ओतून बाबांनी त्या पणत्या पेटत्या केल्या नाहींत का?

त्या जानकीरामाच्या घरीं त्या दिवशी चिंचेचें सार केलें होतें. त्यांत एकाएकीं मोठमोठे किडे नाचत असल्याचें आढळून आलें! जानकीरामासह घरांतील सारीं माणसें घाबरलीं! हा काय प्रकार आहे.! तो प्रकार जानकीरामाने अचूक ओळखला. खाई त्यास खवखवे! ज्यानें चूक केली त्याला त्याची जाणीव!

महाराज बसले होते बंकटलालच्या घरीं आरामांत. ओशाळा झालेला जानकीराम बंकटलालच्या घरीं आला व त्यानें आपला अपराध व त्यापायीं झालेलें शासन हें सर्व त्याला सांगितलें. बंकटलालला त्याची दया आली. जानकीरामनें महाराजांच्या पायांवर मस्तक ठेवलें व त्यांची प्रार्थना केली. महाराजानीं तें साराचें किडेमिश्रित भांडें घेऊन यायला सांगितलें. तें पुढ्यांत येतांच महाराजांनीं त्याला हस्तस्पर्श केला. क्षणार्धांत सर्व किड्यांनीं पलायन केलें !

## मधमाशांनीं सर्वांना पळविलें !

शेगांवचा बंकटलाल हा महाराजांचा मोठा भक्त, त्यानें आपल्या शेतवाडींत मका पेरला होता. तो चांगला गरगरून आला होता; त्याला वाटलें महाराजांना एकदा आपल्या मळ्यावर घेऊन जावें आणि त्यांना मक्याची कोवळीं कणसें व्यवस्थित भाजून तेथेच खायला द्यावीं. बरोबर आणखीही मित्रमंडळी होतीच; त्या मळ्यांतील जवळपासच्या झाडांवर मधमाशांचीं पोळीं होतीं. मळ्यांत आग पेटविण्यांत आली. धूर दूरवर पसरूं लागला. पोळ्यांतील मधमाशा चिडल्या! त्यानीं महाराजांसह जे जे लोक मळ्यांत गप्पा मारीत बसले होते त्यांच्यावर कडाडून हल्ला केला. त्याबरोबर काय झालं असेल हें सांगायला का हवें ?

महाराजखेरीज करून तेथून सारे हां हां म्हणतां पळाले! प्रत्येकाला आपल्या जिवाची काळजी! दुसऱ्यांचे कांहीं का होईना! मधमाशांना काय? त्या साऱ्या महाराजांच्या अंगाला चिकटल्या! महाराज त्यांच्या लीला पहात स्थितप्रज्ञतेनें तेथें स्वस्थ बसून होते. आणि तेथून जे लोक पळाले ते दुरून तो देखावा पहात होते. जवळ जाऊन महाराजांना उठवावें किंवा दुसरा कांहीं इलाज करावा अशी एकालाही छाती झाली नाहीं!

महाराज माशांच्या तावडींत सांपडलेले पाहून बंकटलालची मात्र स्थिति करुणाजनक झाली! त्यांना काय करावें सुचेना. तो तडफडत होता, तळमळत होता! त्याच्यानें रहावेना. त्यानें स्वतःचा जीव धोक्यांत लोटला आणि तो धांवला महाराजांकडे,

मग महाराजांनीं काय केलें? 'चालत्या व्हा येथून'! असा त्या मधमाशांना हुकूम सोडतांच त्या भराभर निघून गेल्या! बंकटनें जवळ जाऊन पाहिलें तर महाराजांच्या सर्वांगांत मधमाशांचे कांटे रुतलेले होते.

बंकटलाल म्हणाला "महाराज, हे अंगावरील काटे काढण्यासाठीं मी एखादया सुवर्णकाराला चिमटा घेऊन बोलावूं का?"

त्यावर महाराज म्हणाले "बंकट! कशाला हवाय रे सुवर्णकार? कोणी नको! मी थोडे फार योगशास्त्र जाणतो त्या शास्त्राच्या बळावर सारे काटे निघून जातील; जशा माशा पळाल्या तसे?

नंतर महाराजांनी कुंभक केला आणि त्यामुळे महाराजाचा आश्रय सोडून काट्यांना तेथून नाहींसे व्हावे लागले?

एवढे झाल्यानंतर महाराजांनी सर्व माशांना विनंति केली की आम्हा सर्वांचे मकाकणसे खाणे पूर्ण होऊन आम्ही येथून निघून जाईपर्यंत तुम्ही आमच्याकडे ढुंकूनही पहायचे नाही. बंकटची इच्छा मला पूर्ण करायची आहे.

कणसें काय किंवा लाडू करंज्या काय? खाण्याला सर्व जमतात; परंतु संकट ओढवलें असतां कोणी जवळ नाहीं. तेव्हां ईश्वराकडे लक्ष ठेवा. आपुलासा देव करा! 'हें ध्यानीं असूं द्या' असा सदुपदेश या प्रसंगी महाराजानीं सर्वांना केला.

## कावळ्यांचा काव काव कायमचा बंद !

श्रीगजानन महाराजांचे चमत्कार किती म्हणून सांगावे ? जवळच्याच अकोली गावांत भंडारा होता, त्यात भाग घेण्यासाठीं जसे शेकडो लोक आले होते त्याचप्रमाणें काव काव करणाऱ्या हजारो कावळ्यांनीं त्याच वेळीं एकच गोंधळ उडवून दिला होता ! या आपत्तींतून कसें पार पडावें या विवंचनेंत व्यवस्थापक होते. कारण त्यांच्यावर सत्ता कोण चालविणार ? श्रीगजानन महाराज त्या प्रसंगीं तेथें हजर होते. त्यानीं चालविलेला गोंधळ पाहून महाराज ताडकन् उभे राहिले व म्हणाले, "आलांत तसे येथून एकदम चालते व्हा. पुन्हा तोंड दाखवू नका !"

आणि काय चमत्कार आहे पहा ! ते कावळे जे तेथून पसार झाले ते कायमचे ! कायमचे म्हणजे कायमचेच ! तेवढ्या त्या भागांत अजूनही कावळा फिरकत नाहीं !

## रक्तपितीच्या रोग्यास बडविलें !

सवळदा नामक गावीं गंगाभारती या नावाचे सर्वसंगपरित्याग केलेले एक रोगपीडित गृहस्थ रहात असत. ते रक्तपितीने गांजलेले होते. त्यांना कोणीही जवळ थारा देत नसे निरुपाय होऊन ते महाराजांकडे आले; त्यामुळे इतर लोक तेथून रोगभयाने दूर दूर पांगायला लागले, परंतु त्यानी शेगावात कायमचे ठाणे मांडले ! ते महाराजांच्या दर्शनासाठी उत्सुक होते आणि लोक तर त्यांना त्यांच्या जवळपास फिरकू देईनात. आता करायचे काय ? लोक गयांवयां करून त्याना सांगत असत की बाबारे ! कृपा करून तूं महाराजांच्या जवळपास येण्याचा प्रयत्न करू नकोस. परंतु गंगाभारतीने महाराजांचें दर्शन घेण्याचा निर्धारच केला होता. तो वाट पाहात होता. जवळ कोणी नाहीं अशी संधी तो पाहात होता. त्याच्या पापाचा क्षय होण्याचा समय जवळ आला होता. एके दिवशी ती संधी त्यांना मिळाली. ते धावत धावत आला आणि त्यानें महाराजांच्या पदकमलांवर आपलें मस्तक ठेविलें.

महाराजांनीं यावेळीं काय करावं ? महाराजानीं आपल्या दोन्हीं हातांनीं त्याचे दोन्ही गाल फडाफड मारून चांगलेच रंगविले ! शिवाय त्याच्या कंबरेवर एक लाथ मारून त्याला आडवा पाडला ! व त्याच्या अंगावर

एक दोन वेळां थुंकलेही! गंगाभारतीला तेंच पाहिजे होतें! या शिक्षेचीच त्याला भिक्षा हवी होती. ती त्याला पूर्णतया मिळाली आणि महाराजांच्या स्पर्शानें गंगाभारती पावन झाले; अंगावर जी थुंकी पडली होती ती त्यानीं सर्वांगाला मलमाप्रमाणें चोळून लाविली. महाराजांची सेवा करीत ते तेथेच राहिले व थोड्याच कालावधींत कायमचे रोगमुक्त झाले!

## दादासाहेब खापर्डे व लो. टिळक

ज्यांना उमरावतीचे नबाव म्हणून ओळखलें जात असे ते दादासाहेब खापर्डे महाराजांच्या दर्शनाचे भुकेले होते. शेवटीं त्यांची एक कथा सांगून हें चमत्कारपुराण संपवूं या.

दादासाहेब खापर्ड्यांवर त्यांची पूर्ण कृपा होती, तेही त्यांची भक्ती मनोभावे करीत असत. त्यांच्या प्रत्येक कार्यांत तें त्याच्या पाठीशीं होते. लोकमान्य टिळक यांच्यावरही त्यांची कृपादृष्टि होती. त्यानीं मंडालेच्या कारागृहात गीतेवरील गीतारहस्य—कर्मयोगशास्त्र हा ग्रंथ यशस्वी रीतीनें पूर्ण केला. महाराजासारख्या संताचे पाठिराखेपण त्यांना लाभलें होतें. संतकृपेशिवाय अलौकिक कामे यशस्वी रीतीनें पार पडत नाहींत. तुरुंगांत जाण्यापूर्वी लो. टिळक यांस भाकरीच्या रूपानें त्यानीं प्रसाद पाठविला होता. तो प्रसाद म्हणजे त्यांचा शुभाशीर्वाद होता.

# उतरा ही पायरी

समाधि सोडोनी साईनाथा उतरा ही पायरी
पंचतत्त्वांचा दीप घेउनी दास उभा दारी – ध्रु० –

शिर्डीमध्ये दावुनी किती तरी चमत्कार भक्तांना
असंख्य रूपें घेउनी गेला परि ओळख ना अज्ञांना
दोन नाण्यांचा अलभ्य ठेवा देउनि भक्तां करी
भाव उमटला अर्थ उमगला "श्रद्धा अन् सबुरी" – १ –

राम रहीम कृष्ण करीम अल्ला मालिक मुखी
सदा उच्चारुनी साईनाथा केलेस आम्हा सुखी
अल्ला तेरा भला करेगा कर ठेवुनिया शिरी
आशीर्वाद हा दिधला भक्तां होण्या सुखी संसारीं – २ –

इथेचि करणें इथेच भरणें ज्याच्या त्याच्या पाठी
उमगलें परी उमजत नाही अशीच ही जग राहाटी
कुणी कुणाचा जगतीं नाहीं दमडी नसता पदरीं
हाती मालक देतां रुपया जन्मभर लाचारी – ३ –

दास विनवितो साई चरणा वास न अभिमानाचा
नित्य घडो मज साई सेवा बाणा स्वाभिमानाचा
साई साई मंत्र मुखी अन् घडो तुझी वारी
उभा दास हा दारी साई उतरा ही पायरी – ४ –

लेखकः— **डी. बी. पोतनीस**

# स्वामी विवेकानंदांचें एक हृदयस्पर्शी पत्र

( मागील अंकावरून )

याकरितां कसलेंहि भय न धरितां खुशाल कामाला लागा. तुम्हाला अडथळा करूं शकेल इतकें सामर्थ्य कोणाच्या आंगी आहे? अरे तुम्ही कोण हें सुद्धां तुम्ही विसरलां काय ? आपण श्रीरामकृष्णांचे दास आहों. आपल्या पदाघातानें या तारागणाचेंहि आपण पीठ करून टाकूं साऱ्या विश्वाचाही कणा आपण उपटून टाकूं. भीति! कोणाची भीति? 'मी देह' या पापी विचाराला जे चिकटून बसतात त्याच मूर्खांच्या हृदयांत भीति आपलें ठाणें बसविते. 'मी दीन, मी दुबळा,' असा दीन कोलाहल हेच लोक करीत असतात. अस्सल नास्तिक ते हेच. या भयाच्या पलीकडे आपण जावें. आपण वीरपुत्र झालों आहों, मग आपणांस भीति कशाची? आम्हां श्रीरामकृष्णदासाचा परमेश्वर हाच.

### आम्ही स्वार्थाचा त्याग केला आहे.

एहिकाचा संग आम्हीं सोडला आहे. अमर निर्झराचें अमृत आम्ही पीत आहों. सर्व तंट्याचें मूळ जो स्वार्थ तो आम्हीं कधींच झुगारून दिला आहे. गुरुचरणांशिवाय दुसरें ध्यान आम्हांस नाहीं. गुरुचरण हेंच आमचें कल्याण-निधान. सर्व जगाला पुनःपुनः वंदन करून या अमृतपानांत आमचे भागीदार होण्याला आम्ही त्याला पाचारण करितों.

हें अमृत श्रुतिसागराच्या मंथनांतून प्राप्त झालें आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश इत्यादिकांच्या शक्तीचें सार त्यांत आलें आहे. जगाचें जीवनसर्वस्व त्यांत ओतलेलें आहे. साऱ्या अवतारांचें तें मूर्तरूप आहे. या अमृताचें आकंठपान श्रीरामकृष्णांनीं केलें होतें आणि ते मूर्तिमंत अमृत बनून गेले होते.

इंग्रजी शिकलेल्या तरुणांना पुढील कार्यासाठीं आपण तयार केलें पाहिजे. त्यांच्यांत शिरून त्यांना आपण उपदेश केला पाहिजे. '**त्यागेनैके अमृतत्व-मानशुः**' हें सूत्र त्यांच्या गळीं उतरविलें पाहिजे. दुसऱ्या हजारों गोष्टींचे

उपदेश करीत सुटण्यापेक्षां हें एकच तत्त्व त्यांना चांगल्या रीतीनें पढवा. ऐहिकाचा छंद सुटल्याशिवाय दैवी सामर्थ्याची प्राप्ति कधींहि होणार नाहीं.

## दुःखे का भोगतों ?

आपण इतकीं दुःखें भोगतों हें कां? याचें कारण हेंच कीं, 'मी दीन, माझ्या हातून कांहीं होणार नाहीं,' असल्या प्रकारच्या नकारात्मक विचारांनीं आमचीं डोकीं तुडुंब भरलीं आहेत. हा रोग नाहींसा होण्यास 'सोऽहं' या मंत्राच्या नित्य जपाशिवाय दुसरा उपाय नाहीं. आमचीं चित्तें बळकट झालीं कीं या रोगाचें उच्चाटन एका घटकेंत होईल. 'मी रोगी आत्मा, मी दुबळा आत्मा,' हें चिंतन सोडून देऊन 'मी शुद्ध आत्मा आहें,' असें अट्टाहासानें म्हणण्यास तुम्ही शिकलां, तर रोग बापडा तुम्हांस काय करणार? तुमचें मूलस्थान कोठें आहे हें एकदां पहा तर खरें. म्हणजे केवढें सामर्थ्य प्राप्त होतें याचा प्रत्यय तुम्हांला येईल. 'मी जगन्मातेचें मूल' असें म्हणण्याऐवजीं क्षुद्र व रोगट विचारांना आपल्या चित्तांत थारा कां द्यावा? असें कोणी म्हणत असेल तर त्याच्या सांनिध्यालाही उभें राहुं नये. मनाचा दुबळेपणा हाही एक संसर्गजन्य रोग आहे. त्याजपासून तुम्ही नित्य दूर राहिलां तर तुमचें सर्व प्रकारें कल्याण होईल. 'अहमस्मि' 'सोऽहं' असे विधायक विचार आपल्या मनाला पढवा. हे लोक बोलून चालून परके असतांही माझे विचार त्यांच्या गळीं उतरतात; आणि तुम्ही जन्मतः हिंदु असतांहि तुम्हांस ते पटत नाहींत, यामुळें नाना व्याधींना तुम्ही मिठी मारून बसलेले आहां. 'वीर्यमसि वीर्यं' 'बलमसि बलं, ओजोऽसि ओजो' 'सहोऽसि सहो, मयि धेहि' हा मंत्र तुम्ही नित्य कां पठन करीत नाहीं? याला कांहीं अर्थच नाहीं काय? संध्यापूजादि कार्यांत जे शब्द तुम्ही उच्चारितां ते सारे अर्थशून्यच झाले काय ? एकादी घटका या शब्दाचा जप मनःपूर्वक आणि अर्थानुसंधानानें तुम्हीं केला, तर तुमचे सारे रोग आणि साऱ्या चिंता विलयास जातील.

तुमचा,

**विवेकानंद.**

# नाम --- माहात्म्य

द्विविधं परमं ब्रह्म मूर्तं चामूर्तमेव च ।
अमूर्तं निर्गुणं ब्रह्म प्रणवो ब्रह्म मूर्तिमत् ॥ १ ॥
प्रणवो बोधरूपं तद् दिव्यशक्तिसमन्वितम् ।
शब्दब्रह्मेति नामेति भगवानिति कथ्यते ॥ २ ॥
ओंकाररूपी तन्नाम हृन्मंदिरनिवासि च ।
निर्लेपं निर्मलं सूक्ष्मं पंचकोशविलक्षणम् ॥ ३ ॥
जीवान्तर्यामि गुप्तं च सिद्धचित्तानुरंजनम् ।
सदा साक्षिस्वरूपं च निःशेषं दोषवर्जितम् ॥ ४ ॥
प्रेमरूपं स्वसंवेद्यं ध्यानगम्यं मनोहरम् ।
नामरूपगुरुं वंदे ब्रह्मचैतन्यविग्रहम् ॥ ५ ॥
दीनानाथ कृपानाथ भक्तिनाथ जगद्गुरो ।
नाम त्वां शरणं यामि मदीयं परमं गुरुम् ॥ ६ ॥
नामैव परमानन्दो नामैव भगवान् स्वयम् ।
स्वस्वरूपं च नामैव नामैव परमं पदम् ॥ ७ ॥
नामैव सद्गुरुः साक्षात् सर्वोपायप्रकाशकः ।
यत्कृपाबिंदुमात्रेण सिद्धो भवति साधकः ॥ ८ ॥
नामैव परमो देवः सम्यक्-कल्याणकारकः ।
नामानुग्रहयुक्तस्य जायते ब्रह्मदर्शनम् ॥ ९ ॥
नामैव सकलं पुण्यं नाम सत्यं सनातनम् ।
नामानन्दनिमग्नस्य देहबुद्धिर्न विद्यते ॥ १० ॥
नामैव परमा विद्या नामैव परमा कला ।
नामस्मरणमात्रेण बद्धो वस्तूपगच्छति ॥ ११ ॥
नामैव निरुपमा शान्तिः नामैव भगवत्कृपा ।
वासनापंकनिर्मुक्ता धन्या नामपरायणाः ॥ १२ ॥
नामैव भक्तिसंकेतो नामैव द्वैतवर्जनम् ।
सान्निध्यं परमेशस्य पवित्रं तमसः परम् ॥ १३ ॥
नामैव निर्ममा वृत्तिः समता सुखदुखयोः ।
श्रवणं मननं ध्यानं नाम्ना करतलायते ॥ १४ ॥

# मुंडकोपनिषद् आणि विज्ञान

## लेखांक दुसरा

लेखकः शाहीरः—**पां. द. खाडिलकर,** एम. ए. बी. टी.

पहिल्या लेखांत शौनकानें अंगिरस ऋषींच्याकडून जाऊन **कस्मिन्नु भगवो विज्ञाते.** हा प्रश्न विचारला, त्याला उत्तर देतांना अंगिरस—ऋषींनीं **परा** व **अपरा** अशा **दोन विद्यांचा** नामनिर्देश केला आणि त्यांचें स्वरूप सांगितलें, इत्यादि वर्णन आलें आहे आणि तेथें प्रथम मुंडकाचा प्रथम खंड संपला. प्रथम मुंडकाच्या द्वितीय खंडांत यज्ञसंस्थेचें महत्त्व सांगितलेलें आहे. पराविद्येचें समग्र ज्ञान होण्यास अपरा विद्या संपूर्ण कळली पाहिजे, हा कटाक्ष ऋषींनीं ठेवला आहे. अपरा विद्येमुळें **अभ्युदय** प्राप्त करून घेतां येतो आणि पराविद्येनें **निःश्रेयस** प्राप्त होतें. यालाच कठोपनिषदांत **प्रेयस्** आणि **श्रेयस्** अशीं नावें दिलीं आहेत. **संपूर्ण मानवत्त्व** प्राप्त करून घेण्यासाठीं अपरा विद्या (ज्यांत चौदा विद्या व चौसष्ट कलांचा अंतर्भाव होतो अशी) प्राप्त करून घेतली पाहिजे. व्यक्त सृष्टींचे संपूर्ण ज्ञान अपरा विद्येनें प्राप्त होतें आणि या ब्रह्मांडाचें नियमन करणाऱ्या परमात्म्याचें ज्ञान, तसेंच जीवात्मा व परमात्मा यांचा अन्यान्य संबंध आणि जगत् जीव आणि परमात्मा यांचें मूळचें **अक्षर स्वरूप** पराविद्येनें कळून येते. म्हणून पराविद्येलाच **ब्रह्मविद्या** असें नांव प्राप्त झालें आहे. मुंडकोपनिषदाने या सर्वांचा विचार परिपूर्णपणे केलेला आहे, हे यथावकाश लक्षांत येईलच. **अक्षरब्रह्माचे** ज्ञान होण्यासाठीं यज्ञयागादिक कर्मे किती प्रमाणांत आवश्यक असतात याचें वर्णन प्रथम मुंडकांतील द्वितीय खंडांत आलें आहे.

यज्ञयागादि कर्मांची आवश्यकता मुख्यतः व्यक्तीच्या व समाजाच्या आचार, विचार व उच्चार या तीन बाबतींत नितांत भासत असते. यज्ञयागादिक

कर्में, व्रतवैकल्यें उपास तापास वगैरे नियम मानवाला शिस्त प्राप्त करून देतात मनाची शुद्धि ब्रह्मज्ञानप्राप्तीसाठी अत्यावशक आहे. हिणकस मनश्चांचल्य सोडून जसजसें व्रतवैकल्याच्या द्वारा शुद्ध होत जाते तसतसे ते ब्रह्म समजून घेण्यास योग्य होत जाते. म्हणून उपनिषदानें यज्ञयागादि मार्ग सांगितलेले आहेत. व तें करावेतच असे सांगितलेलें आहे. **यज्ञ म्हणजे त्याग.** त्यागाशिवाय जगच्चक्र चालणें शक्य नाहीं. द्वितीय खंडांत यज्ञयाग करावा असे स्पष्ट सांगितले आहे.

द्वितीय खंडांत एकूण १३ मंत्र आहेत. प्रथम मंत्र असा आहे.:–

**तदेतत्सत्यं मन्त्रेषु कर्माणि कवयो यान्यपश्यंस्तानि त्रेतायां बहुधा संतानि। तान्याचरथ नियतं सत्यकामा एष वः पन्थाः सुकृतस्य लोके ॥ १ ॥**

याचा भावार्थ असाः– " हें विश्व सत्यस्वरूप आहे. वेदांत जीं कर्में सांगितलीं आहेत असें ऋषींना समजलें तीं अग्नित्रयांवर आधारलेलीं आहेत. पुष्कळ प्रकारचें यज्ञ वर्णिले आहेत. म्हणून हे शुभेच्छा धारण करणाऱ्या ऋषीनो ती यज्ञकर्में तुम्ही निष्काम बुद्धीनें करीत जा. हाच या जगांत तुमचा पुण्याचा मार्ग आहे

या नंतर पुढील मंत्रांतून अग्नीला आहुति तो प्रज्वलित झाल्यावर द्यावी. दोन आज्यभागांच्या मध्यें हविर्द्रव्यांची आहुति द्यावी, असें सांगितले आहे नंतर पौर्णमास, दर्श, चातुर्मास्य वगैरे इष्ट काल सांगितलेला आहे. नंतर अग्नीच्या सात जिव्हांचें वर्णन आले आहे. अशा पद्धतीनें शास्त्रशुद्ध मार्गानें आहुति मिळाल्यावर देवता संतुष्ट होतात आणि आहुति यजमानाला ब्रह्मलोकीं नेतात असें वर्णन आलें आहे. पण या मार्गानें अक्षर ब्रह्म आम्ही घेत नाही असें स्पष्ट वर्णन आलें आहे. सचित्र पुण्य संपल्यावर पुन्हां असें मानव परत भूलोकावर येतात आणि पुन्हां यज्ञयागादि कर्मद्वारा इतर लोकीं जातात आणि पुन्हां येतात पण या येरझारा संपत नाहीं. म्हणून यज्ञयागादि कर्में म्हणजेच ब्राह्मीस्थिति प्राप्त करून घेण्याचे साधन अशी कोणी समजूत करून घेऊं नये.

अशी कर्में म्हणजेच अविद्येचा प्रांत आहे. अशा या प्रांतांत वावरणारे अहंमन्य होतात आणि पुन्हां पुन्हां जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडतात.

पण हीं सर्व कर्मे ब्रह्मसमर्पण बुद्धीनें जे करतात तेच अक्षर ब्रह्म जाणण्यास अधिकारी होऊं शकतात.

पण ही अवस्था किंवा लायकी नुसत्या यज्ञयागांनीं प्राप्त होत नाहीं, तर त्याला गुरुमुखाचीच आवश्यकता आहे. असे १२ व्या मंत्रांत स्पष्टपणें सांगितलें आहे; आणि म्हणूनच शौनक अंगिरस ऋषीकडे गेला होता.

**या विषयीचा एक अभंग—**

**अभंग**--(स्वकृत)

**नानाविध यज्ञ चित्तशुद्धकारी।**
**आचरा भूवरी मुमुक्षु हो! ॥१॥**
**यज्ञकर्म केल्या तृप्त देव होती।**
**सत्त्वगुण येती राहावया ॥२॥**
**उपास तापास व्रतें देवपूजा।**
**चित्तशुद्धि काजा आचरावी ॥३॥**
**यमनियमांनीं रोधुनियां मन।**
**करा नित्य ध्यान अक्षराचें ॥४॥**

मनःशुद्धीसाठी यज्ञकर्माची अत्यंत आवश्यकता आहे यांत मुळींच संशय नाहीं. यज्ञ म्हणजे त्याग करणे, आपल्या जवळ असेल ते दुसऱ्यास देणें. तपाचरण करणें म्हणजे आपल्या आचार–उच्चार–विचारांना संयमद्वारा योग्य वळण देणें. कालांतराने यज्ञ ही कल्पना विस्तार पावली; आणि केवळ अग्नींत आहुति देणें एवढा एकच प्रकार यज्ञाच्या कल्पनेंत राहिला नाही. नामयज्ञ, जपयज्ञ, ज्ञानयज्ञ, द्रव्ययज्ञ वगैरे अनेक प्रकार समाजांत रूढ झाले. व्रतवैकल्यें, यम, नियम, हे सर्व यज्ञाचे प्रकारच समजण्यांत येऊं लागले.

वेगवेगळ्या प्रकारच्या यज्ञकर्मामुळेच हें विश्वचक्र चाललेलें आहे. म्हणून आपणही परमात्म्याचें हें कार्य अखंड चालविले पाहिजे.

**यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः।** हा मंत्र प्रसिद्धच आहे. श्रीमद् भगवद्गीतेंतही अनेक प्रकारच्या यज्ञांचें वर्णन केलें आहेः—

**-श्लोक-**

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।**
**ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥**

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति॥
श्रोत्रादीनींद्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति॥
शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति॥
एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे॥ श्रीमद्भगवद्गीता अ.४॥

नित्यनेम करण्याविषयीं श्री तुकोबारायांचा एक अभंग आता देतोः—

**अभंग**

**कांहीं नित्यनेमाविण। अन्न खाय तोचि श्वान। वायां मनुष्यपण भार वाहे तो वृषभ ॥ १॥ अखंड अशुभ वाणी। खरें न बोलेचि स्वप्नीं। पापि तयाहुनी। आणिक नाहीं दुसरा ॥ २॥ नाहीं संतांचें पूजन। न घडे तीर्थांचें भ्रमण। यमाचा आंदण। शीण थोर पावेल ॥ ३॥ तुका म्हणे त्यानीं मनुष्यपणा केली हनी। देवा विसरुनी। गेली म्हणतां मी माझें॥ ४॥**

## संदर्भासाठीं कांहीं मंत्र व उतारे

### प्रथम मुंडक, द्वितीय खंडांतून--

प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषु कर्म।
एतच्छ्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा नरा मृत्युं ते पुनरेवापि यान्ति॥ मंत्र ७ वा.॥
इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः। नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशन्ति॥ मंत्र १०वा.॥ परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्य कृतः कृतेन। तद् विज्ञार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्॥ मंत्र १२ वा.॥

# स्वामी विवेकानंदांचें सुयोग्य स्मारक

**लेखकः श्री. आप्पाराव**

गेल्या महिन्यांतील एक महत्त्वाची व संस्मरणीय घटना म्हणजे सुमारे सत्तर वर्षांपूर्वी होऊन गेलेले महान् द्रष्टे व ज्यानी आधुनिक भारताच्या उत्थानांत महत्त्वाचा भाग घेतला व भारतीयांच्या सर्वांगीण उन्नतीचा ज्यांना अहोरात्र ध्यास लागला होता असे महाभाग पूज्य स्वामी विवेकानंद यांच्या एका भव्य स्मारकाचें राष्ट्रपतींच्याहस्ते अनावरण झालें.



**स्वामी विवेकानंद**

या थोर पुरुषाच्या स्मारकासाठीं जें पवित्रस्थान निवडण्यांत आलें त्याबद्दल लिहावें तेवढें थोडेंच होईल. स्वामीजीनीं १८९३ सालीं अमेरिकेतील शिकागो शहरीं भरलेल्या सर्व धर्मपरिषदेंत प्रगट होऊन, भारताचा

कीर्तिध्वज तेथें फडकविला. तत्पूर्वी तिकडे जाण्याची व आपल्या देशबंधू भगिनीच्या उद्धारासाठी सर्वपरीने झटण्याची त्यांना जेथे प्रेरणा झाली तें पवित्र स्थान म्हणजे भारताच्या दक्षिण टोकास असलेल्या कन्याकुमारी मंदिराजवळ आहे. जेथें तीन सागरांचा सुंदर संगम झाला आहे. तेथे एक प्रचंड शिला आहे. स्वामीजी भारतभर दौरा करून व जनतेची एकंदर परिस्थिती निरीक्षण करून विषण्ण मनानें शेवटी तेथें आले. कन्याकुमारी मंदिराजवळच प्रचंड शिला त्यांना स्नेहभावानें जणूं काय आपल्याकडे बोलवीत होती. त्यांना शिलेचें एवढें आकर्षण कां वाटावें हें सांगता येणें कठीण आहे. ती एक विधिघटना होती. तेथें जायचें व पोचायचें म्हणजे होडीची जरुरी होती. होडीवाल्यास द्यायला त्यांच्यापाशी त्यावेळीं पैसे नव्हते; परंतु त्यांच्या मनाला लागलेली ओढ जबरदस्त होती, त्यानीं मागे पुढें न पाहातां समुद्रांत उडी मारली व त्या शिलेपर्यंत पोहत गेले ! ज्याचा निर्धार पक्का आहे त्याला संकटांची पर्वा वाटत नाहीं.

असे सांगतात कीं त्या शिळेवर ते एकाकी तीन दिवस रात्रंदिवस ध्यानस्थ बसून राहिले होते. त्याठिकाणीं त्यांच्यांत जें अलौकिक चैतन्य संचारलें तें त्यांना जन्मभर पुरवलें व भारतीय उत्थानास कारणीभूत झालें. असें आहे स्वामी विवेकानंदांच्या व भारताच्याही जीवनांत कन्याकुमारी मंदिराचें व शिलेचें महत्त्व ! ती शिला तेव्हांपासून स्वामी विवेकानंदशिला या सार्थ नावानें ओळखली जात आहे.

ही शिला साधीसुधी नाहीं. तिचे महत्त्व केवळ शब्दांनीं वर्णन करतां येण्यासारखे नाहीं. तिच्यामागे हजारो वर्षांचा उज्ज्वल इतिहास आहे. हिमालय कन्या पार्वती संपूर्ण भारताचें दर्शन करून दक्षिण टोकाच्या या सुंदर किनाऱ्यावर आली. तेथें आल्यावर सागरांतील ती शिला तिच्या मनांत तपश्चर्येसाठीं भरली. तिनें तेथेंच आपलें आसन मांडलें आणि ती आपल्या साधनेंत रमून गेली. तन्मय झाली. अजूनही पार्वतीचें एक पदचिन्ह त्या शिलेवर दाखविलें जातें ! त्या पदचिन्हाची पूजा अर्चा करण्यासाठीं दरवर्षी ठराविक दिवशीं हजारो भाविक भक्त तेथे जमा होत असतात. येथें सिंधुसागर, गंगासागर व हिंदुमहासागर या तीन सागरांचा सुंदर संगम होऊन त्याठिकाणीं तीर्थस्थान निर्माण झाले आहे.

स्वामी विवेकानंद भारतयात्रेसाठीं बाहेर पडले ते लोकस्थितीचें निरीक्षण करण्यासाठीं. आपलें भ्रमण संपवून शेवटीं ते रामेश्वरास गेले व तेथून ते कन्याकुमारीस आले.

आपळा सारा भारतीय समाज दुबळा झालेला आहे. आंतून व बाहेरून तो पोखरला गेला आहे. याबद्दल मनाची खात्री पटली होती. तो समाज सबळ कसा बनवावा, त्यांत चैतन्य कसें निर्माण करावें, याची चिंता व तळमळ स्वामीजीना लागून राहिली होती.

ते या पवित्रस्थानी आले. त्यानीं मंदिरांत जाऊन महादेवी कन्याकुमारीचें दर्शन घेतलें व त्याक्षणी ती शिला त्यांना प्रेमानें आपल्याजवळ बोलावू लागली. वर सांगितल्याप्रमाणें ती पवित्र शिला त्यानीं गाठली व तेथे त्या एकांतांत त्यानी मांडी ठोकून साधना सुरू केली. कुठें जायचें, काय करायचें यासंबंधीचे बेत येथेंच नक्की झाले व भारलेल्या आणि भारावलेल्या मनस्थितींत तेथून ते बाहेर पडले. त्यानंतरच्या काळांत त्यानीं जो दिग्विजय मिळविला त्याचा सारा इतिहास भारतवासियांच्या दृष्टीपुढें आहे. तो आज नव्यानें सांगण्याची मुळींच जरूरी नाही. पाऊणशें वर्षें होऊन गेली त्या काळाला, तरी स्वामीजीनी जो चैतन्याचा व स्फूर्तीचा संदेश दिला तो आजही प्रत्येक भारतवासीयाच्या कानांत दुमदुमतो आहे. दुःख वाटतें ते एकाच गोष्टीचें. त्याकाळी स्वामीनी देशांतील कोट्यवधि जनतेचें व तिला जडलेल्या रोगांचें जें निदान केलें तें आजच्या काळांतही जसेंच्या तसें लागू पडणारें आहे. पारतंत्र्य जाऊन देशाला स्वातंत्र्य प्राप्त झालें तरी आजही, जनता त्याच पूर्वस्थितींत व त्याच अंधकारांत चाचपडत आहे.

किती विचार करण्यासारखी गोष्ट आहे ही ! आजच्या काळालाही दुसऱ्या सवाई विवेकानंदाची जरुरी आहे असें वाटूं लागतें.

स्वामी विवेकानंदांना त्या पवित्र शिलेवर जो साक्षात्कार झाला त्याची वाच्यता त्यांच्याच मुखानें झालेली आहे. आणि तो संदेश तत्पूर्वी त्यांचे गुरुदेव भगवान रामकृष्ण परमहंस यानीही देऊन ठेविला होता. कोणता तो संदेश ? " रिकाम्या पोटाला तुमच्या धर्माचा काहीं एक उपयोग नाहीं. हे गरीब लोक केवळ अज्ञानामुळें पशूंचें जिणें कसें बसें जगत आहेत.

समजा, कांहीं निःस्वार्थी संन्यासी जनतेचे कल्याण साधण्याचा निर्धार करून खेड्यापाड्यांतून हिंडले फिरले, त्या खेडवळ, अज्ञानांत होरपळणाऱ्या लोकांत त्यानीं शिक्षणप्रसाराचें कार्य सुरू केलें, अगदीं खालच्या वर्गापर्यंत पोचून ही ज्ञानज्योत त्यानीं पेटविली तर त्यांतून कांहीं काळानें चांगली सुबुद्ध नि डोळस माणसें बाहेर पडणार नाहीत का ? आपण राष्ट्र म्हणून जगायला शिकलें पाहिजे. आम्ही आपलें भवितव्य, अज्ञानापायीं गमावून बसलों आहोंत. देश स्वतःच्या व्यक्तित्त्वाला व मानवही स्वतःला विसरून गेला आहे. आमच्या अवनतीचें तेंच मुख्य कारण आहे. देशाला व व्यक्तीला तें चैतन्यमय व्यक्तित्त्व आपण मिळवून दिलें पाहिजे. तें मिळवून देणें व जनतेची सर्वांगीण उन्नती करणें हेंच एकमेव ध्येय आपण दृष्टीसमोर ठेवलें पाहिजे."

स्वामी विवेकानंदांचें कन्याकुमारी मंदिराजवळील भव्य व पवित्र शिलेवर सुयोग्य स्मारक झालें व राष्ट्रपती श्री. गिरी यांच्या हस्तें त्याचें समारंभपूर्वक उद्‌घाटनही झालें. त्या निमित्त भव्य स्मारकास साजेसे महोत्सव अजूनही चालू आहेत. भारतांतील बहुतेक राज्यानी या उपयुक्त व सुयोग्य स्मारकाचें महत्त्व ओळखून लाखो रुपये दिले आहेत. या स्मारकासाठी एकूण सुमारें एक कोटी खर्च होतील अशा अंदाज करण्यांत आला आहे.

हें स्मारक परिपूर्णतेला येत आहे ही आनंदाची गोष्ट आहे; परंतु ज्या महापुरुषाचे आपण स्मारक करीत आहोंत त्यांच्या कार्याची, त्यांना दैवी वाणीने दिलेल्या दिव्य संदेशाची. याप्रसंगी आपण आठवण केली पाहिजे. केवळ स्मारकानें व त्यांच्या आठवणीने काय होणार आहे ?

स्वामी विवेकानंदानी जें कार्य धडाडीनें केलें, ज्यासाठी त्यानीं देह अर्पण केला त्या कार्याचा मागोवा आपल्यापैकी प्रत्येकानें घेतला पाहिजे. त्यामार्गानें आपणास जें जें करतां येईल तें तें करण्यासाठी पुढें सरसावलें पाहिजे. "देहं वा पातयामि कार्यं वा साधयामि " अशा निर्धारानें आपण कार्यरत होऊं, तेव्हांच या शिला—स्मारकाची सार्थकता झाली असे म्हणता येईल.

# शास्त्र व तत्त्वज्ञान

लेखक : श्री. ज. शा. देशपांडे

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ प्लँक यांचे लेख असलेले The New Science हे पुस्तक दहा अकरा वर्षापूर्वी प्रसिद्ध झाले. त्यांत शास्त्र कितीही प्रगल्भ झाले तरी ते अपूर्ण राहणार ही गोष्ट त्यांनी मान्य केली आहे. पाच वर्षापूर्वी आदर्श तत्त्वज्ञान (The Ideal Philosophy) हे पुस्तक इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झाले. हे छोटेसे पुस्तक फार विचारप्रवर्तक आहे. त्याचे संपादन करणारे कोण तर 'सुज्ञतेच्या प्रतिमेचे उपासक' (Editors at the shrine of wisdom) हे भिन्न विषयावरचे ग्रंथ एकच गोष्ट सांगतात. शास्त्राची परिणती शेवटी तत्त्वज्ञानात होते हे असले ग्रंथ वाचल्यावर कळून येते. या दर्जाचे ग्रंथ ज्या देशात निर्माण होऊ शकतात ते देश मागे राहणार नाहीत. आपल्याकडे मात्र तत्त्वज्ञानावरचे ग्रंथ बाजूला राहिले, त्यांच्यावरचे लेखही नको असतात.

आताचे युग शास्त्राचे मानलें जाते. शास्त्र मोजमापे घेते व विज्ञान म्हणजे माहिती मिळते. ते वस्तूंच्या बरोबर कल्पनांचाही अभ्यास करते. आपण एकादी वस्तू पाहतो तेव्हां तिची लांबी, रुंदी, रंग इत्यादि अनेक गुण पाहातो, पण त्या सर्व कल्पनांचे तात्काल एकीकरण होऊन वस्तुचित्र तयार होते. शास्त्रही विविध माहिती गोळा करून त्यापासून चित्रे तयार करू पाहाते. शास्त्रज्ञ पुष्कळ वेळा गुप्त पोलिसाप्रमाणे माहिती गोळा करून तिच्यापासून नियम शोधून काढतो पण कांहीं वेळा नियम कल्पून माहितीच्या आधारानें कल्पिलेली गोष्ट बरोबर असल्याचे ठरवतो. या कल्पना कशा निर्माण होतात याचा विचार हा स्वतंत्र विषय होईल. इथें मूलग्राही कल्पना अभिप्रेत आहेत, सटरफटर विचार नाहीत. या दोहोतला फरक लक्षात घेतला पाहिजे व दुसऱ्या वर्गावर विसंबण्याचा

धोका टाळला पाहिजे. त्यासाठी विचारशक्ती व तिचा वापर करण्याची ताकद हवी.

## तत्त्वज्ञानाचा व शास्त्राचा उद्देश

शास्त्राचा उद्देश विज्ञान मिळवणे हा असतो तर त्यामागचे मूलभूत सत्य शोधणे हा तत्त्वज्ञानाचा उद्देश असतो. शास्त्र प्रामुख्याने माहिती शोधते. शास्त्र मोजणी मापे, वर्गीकरण इत्यादि उपकरणानी काम करते तर तत्त्वज्ञान विचार व कल्पनांचा वापर करते. शास्त्र हे 'कसे' हे पाहते तर तत्त्वज्ञान प्रामुख्यानें 'कां' हे पाहते. शास्त्र हे केवळ आधिभौतिक गोष्टीच पाहते असे मात्र नव्हे. विज्ञान आणि सत्य या भिन्न गोष्टी आहेत. सत्य हे विज्ञानाच्या पूर्वीही होते व त्याबद्दलच्या माहितीला आपल्या ऋषींनी ज्ञान म्हटले आणि अन्य ज्ञानाला विज्ञान म्हटले. मोजणी मापणीत गर्क होणाऱ्या शास्त्रज्ञाला सत्याची अनुभूति येणे कठीण आहे. तो तत्त्वज्ञानी असेल तरच ते शक्य होईल.

शास्त्र किती मोठे झाले तरी त्याला मर्यादा राहणार हे शास्त्रज्ञ जाणतात. इंद्रियापासून मिळणारे ज्ञान अपुरे असते व इंद्रियातीत असे कांही तरी अगम्य आहे यांत शंका नाही. नुसत्या इंद्रियापासून खरे संपूर्ण ज्ञान कसे मिळणार ? इंद्रियातीत गोष्टी प्रत्यक्ष ज्ञानानें कळणाऱ्या नसल्यामुळे विश्वाचे पूर्ण ज्ञान मिळवणे शास्त्राला शक्य नाही. शास्त्रानें एक प्रश्न सोडविला कीं दुसरा नवीन प्रश्न तयार असतो. माणूस त्याच्या माहितीवरून विश्वाचे चित्र उभे करतो. पण ते चित्र खास त्याचे असते. ते खऱ्या विश्वाचे चित्र नसते. तथापि शास्त्रज्ञ प्रतीकांचा उपयोग करून कल्पनांचे जग निर्माण करतो. गणितशास्त्र हे या प्रतीकांचे उदाहरण होय. या कल्पनानाही मर्यादा आहे व त्या विश्वस्वरूपापर्यंत पोचत नाहीत. हाइसेनबर्गचा 'अनिश्चिततेचा सिद्धांत' ( Principle of uncertainty ) प्रसिद्ध आहे. त्या सिद्धांताप्रमाणें मूलभूत कणांचे स्थान तरी कळते किंवा संवेग ( Momentum) तरी कळतो. दोन्ही एकावेळी बिनचूक कळणार नाहीत. या परिस्थितीमुळे नुसते शास्त्र सत्यान्वेषण करू शकणार नाही. पण ध्येयप्राप्तीसाठी धडपड करण्यातच आनंद असतो हे खरे शास्त्रज्ञ व तत्वज्ञानी ओळखतात.

सर्व जग कार्यकारणभावाने बद्ध असते. मग त्यात स्वतंत्र इच्छाशक्ती ( Free Will ) हिचे काय स्थान हा प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो.

वस्तुतः दोघांचा प्रांत भिन्न आहे. कार्यकारणभाव असतो म्हणून माणसाला इच्छाशक्ती वापरता येणार नाही असे नाही व असे म्हणून त्याला आपली जबाबदारी टाळता येणार नाही. तो जे निर्णय घेतो त्यामागे कारणपरंपरा असते एवढाच अर्थ त्याची इच्छाशक्ती किती स्वतंत्रपणे काम करू शकेल हे त्याच्यावरच अवलंबून असते. या शक्तींचा जगाशी काय संबंध असतो व मेंदू नष्ट झाल्यावर जग असते पण शक्ती कुठे जाते ? शास्त्र या गोष्टींचे उत्तर देऊ शकत नाहीं

हल्लीं शास्त्र काहीं म्हणो एकीकडे लोक जडवादी झाले आहेत तर दुसऱ्‍ीकडे तेच लोक चमत्कारादि गोष्टींच्या मागे धावतात असे दृश्य दिसते. हे होण्याचे कारण असे कीं मनाच्या आंत एक प्रांत असतो तेथे निवळ आधिभौतिक कल्पना चालत नाहीत. या प्रांतात जेव्हां कार्यकारणभावापेक्षा इच्छाशक्ती महत्त्वाची असते व बुद्धिमत्तेपेक्षा चारित्र्य व निष्ठा महत्त्वाची होतात, तेव्हां शास्त्र व तत्त्वज्ञान यांचा समन्वय होतो व सृष्टीचे मूल जे परतत्त्व त्याचा शोध घेण्याच्या प्रयत्नात शास्त्राची मदत मिळते.

## मन आणि कल्पना

माणसाचे मन ही एक प्रचंड शक्ती आहे. मनाचे जागृत व अंतर्मानसिक भाग कल्पिले जातात. दुसऱ्या भागाची जाणीव फार थोड्या लोकांना असते. मोठमोठे शोध मनाच्या शक्तीने लागले. ही शक्ती कोठून आली ? विश्वाचा पसारा ज्या मनात समाविष्ट होतो ते मन केवढे मोठे ? तत्त्वज्ञान या प्रश्नांचे उत्तर देण्याचा प्रयत्न करते.

मांजर म्हटले म्हणजे रूप, रंग इत्यादींनी एक कल्पना तयार होते. ही कल्पना सर्वसाधारण असते. प्रत्यक्षातले मांजर कल्पनेपेक्षा थोडे फार निराळे असेल. प्राणी ही कल्पना मांजर या कल्पनेपेक्षा आणखी सामान्य होते. सगळ्या कल्पना वस्तूशीच निगडित असतात असे नाही. मुलाना लहानपणी सत्य, न्याय यांची तीव्र जाणीव असते, पण ती पुढे मागली जाते. ही जाणीव कुठुन येते ? आकड्यांची गोष्ट पहा. आकडे ही कल्पना होय. दोन ही कल्पना आहे. वस्तू नष्ट होतील पण दोन म्हणजे दोनच राहाणार. वस्तूपेक्षा कल्पना जास्त मोठ्या ! माणूस ही देखील मांजराप्रमाणे कल्पना नव्हे का ? माणसाचे श्रेष्ठत्व विचार-

शक्तीत असते, तेव्हां माणसाच्या कल्पनेत त्याची विचारशक्ती प्रमुख धरा कीं एक भव्य चित्र डोळ्यांसमोर उभे राहातें व सृष्टीच्या उद्दिष्टांत विचारवंत माणूस हे प्रमुख उद्दिष्ट नाहींना असे वाटते. अशा चित्रांची कल्पना करणारे विश्वमन केवढे मोठे असेल असा विचार येतो.

## तत्त्वज्ञान व नीति यांची जरूरी

प्रत्यक्ष जगाचे व्यवहार पाहू लागलो तर आधुनिक युगात सर्वच अस्वस्थता दिसते. तिच्या कारणावर खूप लिहिले जाते. त्याबरोबर जबाबदारीची जाणीव न आल्याने उत्पन्न होणाऱ्या अनिष्ट गोष्टीना आळा घालण्यासाठी इतके नवीन नियम व कायदे झाले कीं त्यांनी स्वातंत्र्यच नष्ट केले. आतां भाराभर कायद्यानी कांहीं होणार नाही अशी अवस्था आहे व तीसाठी मूळ रोगावर उपचार झाला पाहिजे माणसाने निव आधिभौतिक दृष्टी ठेऊ नये अशी व्याख्याने समाजातले मोठे लोक देतात पण तेच उलट वर्तन करितात. जीवनाची परिस्थिती रोज झपाट्याने बदलते परंतु तिला तोंड देण्याची समाजाची तयारी नाही. शिक्षण हा सामाजिक रोगावरचा मुख्य उपाय पण शिक्षणप्रांत व वाङ्मयप्रांत पैशाच्या मागे असणाऱ्या स्वार्थी लोकांनी व्यापला गेला आहे त्यावर काय उपाय? केवळ आधिभौतिक गोष्टीपासून सुख न मिळतां दुःख मिळते मोटार घेतली कीं कोणी तिचा रंग खरवडील याची काळजी तयार होते.मनांत प्रेमभाव ठेऊन जीवनाचा तोल राखणे ही फार महत्वाची बाब आहे. परंतु आधुनिक संस्कृतीत प्रेमभाव नष्ट होत असून जीवनाचा तोल जात असल्याचे दिसते. कुटुंबवत्सल माणूस कुटुंबात वागतो तसेच प्रत्येकजण समाजात वागेल तर क्रांती होईल. परंतु आज खुद्द कुटुंबातले प्रेम नाहीसे होत असून कुटुंब हेच युद्धभूमीचे क्षेत्र होत आहे. यामुळे जगातली युद्धे अजून बंद होत नाहीत. समाजाच्या मूळरोगावर उपचार होण्यासाठी तत्त्वज्ञान व नीति यांची जरूरी आहे.

## नीति काय करते?

नीति कसे वागावयाचे याबद्दल नियम घालून देते. हे नियम स्थलकाला-प्रमाणे बदलू शकतात. आताच्या नीतीच्या कल्पना अनेक बाबतीत पूर्वीपेक्षा भिन्न आहेत. नीतीबद्दलच्या कल्पनांचा संबंध शेवटी सत्य, असत्य, चांगले, वाईट यांच्या कल्पनाशी येतो . तरी एकंदरीत नीतीची कल्पना संपूर्णतः स्पष्ट-

पणे मांडणे कठीण जाते. या कल्पनेच्या बुडाशी एक गोष्ट निश्चितपणे असते. ती म्हणजे सदसद्विवेक बुद्धी. तिचीही स्पष्ट व्याख्या करता येत नाही. वास्तविक पाहाता सद्सद्विवेक बुद्धीने निरनिराळ्या लोकांना निरनिराळे सांगू नये, परंतु तिच्यावर कमी जास्त पुटें बसतात व हा प्रकार होतो. या नीतीच्या तीन पातळ्या मानता येतील. एक वैयक्तिक, दुसरी सामाजिक व तिसरी सर्वोच्च त्रिकालाबाधित सत्याची प्रत्येक माणसाला स्वतःची वैयक्तिक पातळी असते. मात्र तिचा सामाजिक पातळीशी मेळ बसावा लागतो नाहीतर संघर्ष होईल. बहुसंख्य लोक मेळ बसवतात. मेळ न बसणारे समाजाचे शत्रू असतात किंवा फार उच्च कोटीतले लोक असतात. या उच्च कोटीतल्या लोकांच्या कल्पना समाजापेक्षा भिन्न असतात व ते कुणास न भिता त्रिकालाबाधित सत्य पाळण्यास उद्युक्त होतात. हे तत्त्वज्ञानी असतात व समाज टिकवण्यात त्यांचा वाटा फार मोठा असतो.

### आदर्श तत्त्वज्ञान.

माणूस हा एक प्राणी असला तरी इतर प्राण्यापेक्षा त्याच्यात कांहींतरी जास्त आहे ही गोष्ट जडवादी विसरतात. गंमतीची गोष्ट ही कीं पुष्कळ वेळा जडवादी मृत्यूला भीत नाहीत पण अध्यात्मवादी भितात. याचे कारण अध्यात्मवाद्याना पलीकडच्या अज्ञानाचे भय वाटते. त्यामुळे पुरातन कालापासून अमरत्व मिळवण्याची धडपड चालू आहे. प्रत्येक मन हे विश्वमनाचा भाग असणार, परंतु अंश पूर्णाइतका मोठा होऊ शकत नाही, तो एकरूप मात्र होऊ शकेल. एकरूपतेसाठी श्रद्धा लागते, नाहीतर मधे मोठी दरी उभी राहाते. त्यासाठी तत्त्वज्ञान हवे, वस्तुतः धर्म म्हणजे तत्त्वज्ञानेच आहे. तत्त्वज्ञांनाच्या चष्म्यातून दृश्य जगाला महत्व नाही असे नव्हे, पण ते दुय्यम दर्जाचे. त्याचा फाफटपसारा फार. त्यांतून मन विलग्न व मुक्त झाले कीं वैयक्तिक आवडींनिवडीसारख्या गोष्टी क्षुद्र असतात हे कळून येते व ते स्वतंत्र विचार करू शकते. मन स्वतंत्र होणे हेच अमरत्वाचे साधन व हे प्राप्त करून देणारे तत्वज्ञान जे असते ते आदर्श तत्वज्ञान. त्यापासून खरे ज्ञान मिळते व सत्यदर्शन होते ते सर्व जगात एकच असते, फक्त परतत्वाच्या अनंततेमुळे अनंत प्रकारांनी प्रगट होत असते. त्यांची जाणीव तेवढी झाली पाहिजे.

# योगिराज श्रीगुळवणी महाराज यांच्या जीवनकार्याचा उद्‌बोधक परिचय

( लेखांक १ ला )

लेखक : श्री. द. सा. मांजरेकर, चेंबूर

**योगिराज गुळवणी महाराज ही सध्यांच्या काळांतील आपल्यांत वावरणारी एक थोर विभूति व शक्ति आहे. शक्ति दीक्षेच्या लोहचुंबकामुळें असंख्य भक्त त्यांच्याकडे खेचले गेले आहेत. केवळ स्पर्शानेंच नव्हे तर संकल्पानें शक्तिपात दीक्षेचा लाभ होणें हा या काळांतील एक महान् चमत्कार आहे. हा चमत्कार म्हणजे सर्व चमत्कारांचा राजाधिराज आहे.**

स्वामी विवेकानंदांना भगवान् श्रीरामकृष्णांनी निव्वळ स्पर्शानें एका दिव्य अनुभूतीचा आनंद प्राप्त करून दिला होता. स्वामींना अनुभव आला कीं अखिल विश्व गरगर फिरून शून्यामध्यें विलीन होत आहे. त्याच प्रमाणें त्यांची अस्मिता सुद्धां शून्यामध्ये जात आहे. अशाच तऱ्हेच्या दिव्य अनुभूतींची प्राप्ति निव्वळ स्पर्शानें आणि स्पर्शही न करतां केवळ संकल्पानें सच्छिष्याला करून देणारे महात्मे आजही आमच्यामध्यें वावरत आहेत. आपल्याच मायेच्या योगानें आपले हें रूप जनसामान्यांपासून अशा विभूति लपवून ठेवतात, म्हणूनच आम्ही त्यांना ओळखूं शकत नाहीं. भगवान्



श्रीरामकृष्णांना तरी त्यांच्या हयातीमध्यें किती लोकांना ओळखलें होते ? अगदीं थोड्याच जनांना त्यांच्याच कृपेनें कळलें होतें कीं ते थोर अवतारी पुरुष आहेत.

आजही भगवान् श्रीरामकृष्णांच्या तोडीचे थोर शक्तिउपासक, दत्तावतारी योगिराज श्रीगुळवणी महाराज आमच्यामध्यें वावरत असूनही त्यांचें खरें रूप आम्ही जाणू शकत नाहीं. ज्यावेळीं एखाद्याच्या महान् भाग्यानें त्याला श्रीगुळवणी महाराजांच्या योगदीक्षेमुळें वर उल्लेख केल्यासारखा दिव्य अनुभव प्राप्त होतो त्यावेळीं ती भाग्यवान व्यक्ति आश्चर्यानें दिङ्मूढ होते. म. म. द. वा. पोतदार यांनी " हें झाकलें माणिक इतके दिवस आमच्यामध्यें वावरत होते पण त्यांची आम्हाला ओळख कशी पटावी ? " असे उद्गार काढले होते. श्रीगुळवणी महाराज नूतन मराठी विद्यालयामध्यें ड्रॉइंग शिक्षक होते; त्याच वेळीं म. म. पोतदार तेथें मुख्याध्यापक होते.

## महाराजांचा पूर्वेतिहास

श्रीगुळवणी महाराजांचा जन्म कोल्हापुर परिसरामध्यें कुडूची गावीं 'शुचीनां श्रीमतां गेहे-' झाला. श्रीमहाराजांचे वडील दत्तात्रेयशास्त्री गुळवणी थोर दत्तभक्त होते. दत्तभक्तीची परंपरा महाराजांच्या कुटुंबामध्यें त्यांचे आजोबा नागेशभटजी गुळवणी यांच्यापासून आली होती. या नागेशभटजींना दत्तभक्त व थोर महात्मे श्रीनारायणस्वामी यांनी "कुलोद्धारक पुत्रपौत्र होतील" असा आशीर्वाद दिला होता. त्याचेंच जणू फळ म्हणून दत्तात्रेय शास्त्री गुळवणी व त्यांचीं सर्वच मुलें भगवद् भक्त निपजली. श्रीमहाराजांचे ज्येष्ठ बंधू शंकर भटजी यांनी तर आपल्या उत्तर आयुष्यांत चतुर्थाश्रम स्वीकारून श्रीक्षेत्र वाडी येथें उर्वरित आयुष्य वेंचलें. श्रीमहाराजांच्या भगिनी गोदूताई यांचाहि पारमार्थिक अधिकार फार मोठा होता.

श्रीमहाराजांच्या मातृदेवता उमाबाई यांची दत्तभक्ती विशेष उल्लेखनीय आहे. दत्तात्रेय शास्त्र्यांच्या प्रथम पत्नी उमाबाई व त्यांची सातहि अपत्यें कालवश झाल्यावर दत्तात्रेयशास्त्र्यांनीं द्वितीय विवाह केला. याही पत्नीचें नांव उमाबाई ठेवले. वडील दत्तात्रेयशास्त्री व माता उमाबाई प्रतिपौर्णिमेला घोड्यावरून नरसोबाच्या वाडीची वारी करीत. दोघांचीही उपासना कडक होती. अशाच एका वारीच्या वेळी उमाबाईनीं श्रीगुरुपादुका प्रसाद लाभावा म्हणून कडक

उपोषण सुरू केलें. उपोषणाच्या सातवे दिवशी देवासमोर ध्यानस्थ बसल्या असतांना उमाबाईच्या ओटीमध्यें भगवान दत्तात्रेयांनी एक कागदामध्यें अष्टगंधयुक्त चांदीच्या पादुका पुडी करून प्रसाद म्हणून दिल्या. या श्रीगुरुपादुका अद्यापही श्रीगुळवणी महाराजांच्या नित्यपूजेमध्यें आहेत.

## सकूबाईच्या रोगाचें निवारण

उमाबाईच्या कनिष्ठकन्या सकूबाई यांच्या वेळी गरोदरपणी पोटामध्यें एक असाध्य रोग झाला होता सर्व वैद्यकीय उपचार करून थकल्यावर दैवी उपचार करण्यासाठी ज्येष्ठपुत्र शंकरभटजी यांच्यासह उमाबाई वाडी येथें आल्या व श्रीनारायण स्वामींच्या आश्रमात राहून त्यांनीं श्रीसेवा सुरू केली. एके दिवशीं दुपारी उमाबाई सोवळ्यांत स्वयंपाक करीत असतां दारीं एक संन्याशी आले. उमाबाईनी हात धुवून स्वामींना नमस्कार केला. संन्यासी अपरिचित दिसले. त्यानीं उमाबाईना दोन पळ्या तीर्थ दिले व ते निघून गेले तीर्थ प्राशन केल्यावर थोड्याच वेळामध्यें उमाबाईच्या पोटांतील रोग फुटून त्यांतील किल्मिषांचा प्रवाह वाहू लागला. व त्याच थारोळ्यामध्यें उमाबाई बेशुद्ध होऊन पडल्या. प. प. श्रीवासुदेवानंतर सरस्वती यांच्या दुर्गा मावशी जवळच रहात होत्या; त्यांच्या सहाय्यानें उमाबाईना शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न झाले. यानंतर दिसून आले कीं उमाबाईच्या पोटांतील रोग पूर्णपणे बरा झाला आहे. त्यामुळे तीर्थ देणारे स्वामी दुसरे तिसरे कोणीही नसून साक्षात श्रीनृसिंह सरस्वती स्वामीमहाराजच होते अशी सर्वांची खात्री झाली. भक्ताचे रक्षण भक्तवत्सलाशिवाय दुसरे कोण करणार ?

## दत्तमहाराजांचा दृष्टांत

दत्तात्रेय शास्त्री श्रीगुरुचरित्राचीं पारायणें करीत असतां उभयतांस आपण तुमच्या उदरी देवकार्यार्थ येणार असा श्रीदत्तमहाराजानीं दृष्टांत दिला आणि या दृष्टांता प्रमाणे मार्गशीर्ष वद्य १३ शके १८०८ गुरुवार दिनांक २३ डिसेंबर १८८६ रोजी कुडुची मुक्कामीं श्रीगुळवणी महाराजांचा जन्म झाला. मासानां मार्गशीर्षमध्यें गुरुवारीं श्रीगुरुदेव पृथ्वीतलावर अवतीर्ण झाले. श्रीदत्तमहाराजांचा हा कृपाप्रसाद वाडी येथें त्यांच्याच श्रीचरणांवर घालून मातापित्यांनीं नवजात शिशूचें नांव वामन

ठेवलें. जणूकांहीं ही वामनमूर्ती आपल्या अलौकिक "गुरुभावानें" त्रिखंड उजळून टाकणार असेंच त्यांना त्यावेळीं भासलें असावें.

सर्व सामान्य बालकांप्रमाणें बाल वामनामध्यें खेळण्याची वृत्ति दिसून आली नाहीं. त्यांचा स्वभाव बालपणापासूनच एकांतप्रिय असावा. वामनरावजींचें प्राथमिक शिक्षण तारळ्यास व पुढील शिक्षण कोल्हापूर येथें राजाराम हायस्कूल-मध्यें झालें. त्यांच्या एकांतप्रिय स्वभावाचें फलित म्हणूनच कीं काय विद्यार्थ्या-सामध्यें त्यांची विशेष प्रगति दिसून आली. राजाराम हायस्कूलमध्यें शिकत असतांना व पुढें पंडित आत्माराम शास्त्री चित्रे यांचेपाशीं संस्कृत अध्ययन करीत असतांना त्यांनी कांही शिष्यवृत्त्या व पारितोषिकें मिळविलीं होती. वामनरावांचा उपनयनसंस्कार वयाच्या आठव्या वर्षीं झाला. घरीं वडीलबंधूपाशीं त्यांनीं संध्या, पूजा, वैश्वदेव, पुरुषसूक्त आदि धर्माचाराचें शिक्षण घेतलें.

## चित्रकलेची आवड

बालपणापासून वामनरावजींचा चित्रकलेकडे ओढा होता. त्यानुसार त्यांनीं चित्रकलेचें शिक्षण घेऊन मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्यें थर्ड ग्रेड परीक्षा दिली. या नंतर पुढील शिक्षणासाठीं वामनरावजीनीं अमेरिकेला जाण्याचा प्रयत्न केला. पण फलकावर चित्रे रंगविण्यापेक्षा अनेक मुमुक्षूजीवांची जीवनें आपल्या आध्यात्मिक तेजानें त्यांनीं रंगवावीं अशी परमेश्वराचीच इच्छा असल्यानें अमेरिकेला जाण्याचा प्रयत्न असफल झाला. असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं साधारण याच वेळेपासून वामनरावजींच्या हृदयामध्यें विरक्तीनें प्रवेश केला. वडीलमंडळींची इच्छा होती की त्यांनीं आतां नोकरीधंदा करावा व चतुर्भुज होऊन चांगला संसार करावा. पण विरक्तीनें ज्यांच्या हृदयामध्यें प्रवेश केला, त्यांना संसार करण्याची इच्छा व्हावी कशी ?

१९०७ सालची गुरुद्वादशो. या दिवशीं प. पू. श्री. वासुदेवानंद स. टेंबे स्वामींचा मुक्काम वाडी येथें होता. विशेष म्हणजे या दिवशी श्री. स्वामीनीं पंक्तीमध्यें येवून स्वतः प्रसाद ग्रहण केला. या वेळीं वामनरावजींचे ज्येष्ठ बंधू शंकरभटजी वाडीला होते, व वामनरावांचा मुक्काम कोल्हापुरी. वडील बंधूनीं पत्रद्वारें वामनरावजींना एक संस्कृत श्लोक लिहून कळविला व हा श्लोक मालारूपाने भगवान दत्तात्रेयांच्या कंठामध्यें गुंफला

आहे असे दत्तात्रेयांचें चित्र तयार करून आणावें असा आदेश दिला. वामनरावजींनीं असें चित्र तयार करून ते स्वतःच वाडी मुक्कामीं घेऊन गेले व तें चित्र टेंबेस्वामींना अर्पण केलें. या अपूर्व गुरुशिष्यांची ही प्रथम भेट. भगवान दत्तात्रेयांचें तें विलोभनीय चित्र पाहून स्वामी खूष झाले व स्वतःपाशीं असलेली सुवर्णालंकार मंत्रसिद्ध पेटी त्यांनीं वामनरावजींना आशिर्वाद म्हणून दिली. याच मंत्रपेटीनें वामनरावजीचें पुढील जीवन घडविलें. त्या पेटीच्या रूपानें श्रीगुरु टेंबेस्वामी वामनरावजींच्या सदा सान्निध्यांत राहून त्यांच्यातील गुरुभाव पूर्ण विकसित होण्यासाठीं पुढील सर्व साधना त्यांनीं वामनरावजी-कडून करवून घेतली. हा गुरुप्रसाद अजूनहि वामनरावजीच्या हातामध्यें आहे.

१९०९ साली वामनरावजीचे वडील दत्तात्रेय शास्त्री यांनी देह ठेवला व ते श्रीचरणीं लीन झाले. यापूर्वीच संसाराचा भार ज्येष्ठ पुत्र शंकरभटजी यांनी उचलला असल्यामुळें प्रापंचिक अडचण तशी विशेष जाणवली नाही. वडिलांचें और्ध्वदेहिक आटोपून शंकरभटजी पवनीं येथें गेले होते. कारण श्री टेंबे स्वामींचा १९ वा चातुर्मास पवनी येथे होता. शंकरभटजींनी मागाहून पत्र पाठवून मातोश्रीना वामनराव व गोदूताई यांच्यासह पवनीस बोलावून घेतलें व शके १८३१ च्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी या सर्वांना श्रीटेंबे स्वामीकडून अनुग्रह देवविला. यानंतर टेंबेस्वामी काश्मीरकडे निघून जाणार होते.

## गुरुदर्शनाची तळमळ

यावेळी वामनरावजीची मनस्थिती मोठी विचित्र झाली होती. एका बाजूला वडीलबंधूना कुटुंबपोषणाच्या जबाबदारीमध्यें हातभार लावावा असें कळकळीने वाटत होते तर एका बाजूला हृदयामध्यें तेवत असणारी विरक्ती आणि गुरुसेवा व गुरूसान्निध्याची ओढ त्यांना संसारापासून दूर ओढीत होती. स्वतःच्या अंतःकरणामध्यें संसाराबद्दल पूर्ण विरक्ती असूनसुद्धां कुटुंब पोषणासाठी म्हणून वामनरावजीनी नोकरी करण्याचें ठरविलें. मुंबईला नोकरीसाठी प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. म्हणून गाणगापुरी जाऊन गुरुचरित्राची पारायणें करण्याचे त्यांनी ठरविलें.

त्यानुसार गाणगापुरीं जावून पारायणें सुरू केलीं. या वेळीं श्रीगुरुदर्शनाची तीव्र ओढ त्यांच्या हृदयामध्यें निर्माण झाली. चौकशीअंती कळले कीं श्रीटेंबे स्वामी यांचा त्या सालचा चातुर्मास हावनूर येथें होण्याचा संभव आहे. यावेळ पावेंतों वामनरावजींना पाहिजे तेवढा गुरुसहवास लाभला नव्हता. गुरुदर्शनाच्या तळमळीनें वामनरावजींचा जीव अगदीं व्याकुळ झाला. जवळ प्रवासासाठीं द्रव्य नव्हतें. म्हणून गाणगापूरहून हावनूरचा प्रवास त्यांनीं पायीच सुरू केला. गुरुमाउलीनें सुद्धां या वेळीं शिष्याची जणू परिक्षाच पहायचें ठरविलें होतें. गाणगापूरहून हुटगीमार्गें अहेरवाडी, विजापूर, सितिमानी असा पायीं प्रवास सुरू झाला. मागें कळलें कीं टेंबे स्वामींचा मुक्काम धारवाड येथें आहे.ही बातमी कळतांच जवळची घोंगडी दोन रुपयांना विकून वामनराव रेल्वेनें धारवाडला पोंचले पण यापूर्वीच टेंबे स्वामी धारवाड सोडून पुढें निघून गेले होते. गुरुशिष्यांचा हा पाठशिवणीचा खेळ पुढें सुरू झाला. या प्रवासामध्यें वामनरावजींना जे कष्ट भोगावे लागले त्यांच्या निव्वळ कल्पनेनें आम्ही गलितधैर्य होऊन जातों. कित्येक मैलांचा पायीं अनवाणी प्रवास, डोकीवर प्रखर सूर्य, पोटामध्यें जठराग्नि प्रज्वलित झालेला पण जेवणाचीं कांही सोय नाहीं; कधीं पूर्ण उपवास काढीत, तर कधीं अर्धपोटी तर कधी अन्नछत्रामध्यें जेवण घेत ही पदयात्रा सुरू झाली. धन्य ते गुरु आणि धन्य ते शिष्य घेत ! ज्या महाभागांच्या हृदयांमध्यें येवढी तीव्र गुरुभक्ति निर्माण होते आणि गुरुदर्शनासाठी जीव जीवाना वेगळी मासोळी" असा तळमळतो ते श्रीगुरुंच्या आशिर्वादानें परमेश्वर पदाप्रत जावून पोंचले तर नवल नाही. आम्ही साधारण जीवांनी त्यांचा या उत्कटतेची नुसती कल्पनाच करावी.

## सद्गुरूंची सेवा

वामनराव धारवाडहून गदग, तेथून हरिहर, हुबळी वगैरे ठिकाणें करीत आव्वेगिरी गांवी पोचले. येथें टेंबे स्वामींचा मुक्काम आहे असें त्यास कळलें होतें पण टेंबे स्वामी तेथूनहि पुढें निघाले होते. शेवटीं हावनूर मुक्कामी गुरुशिष्यांची भेट झाली. हावनूरच्या मुक्कामामध्यें वामनरावजीनी गुरुसेवेचा भरपुर लाभ करून घेतला. श्रीगुरुदेवाबरोबर माधुकरी मागणें, भोजनोत्तर महाराजाचें उष्टें काढणें यांची छाती स्वहस्तें धुणें अशा प्रकारची भरपूर गुरुसेवा करण्याची संधी वामनरावजीनी प्राप्त करून घेतली. गुरुसेवाही अत्यत श्रेष्ठ अशी साधना आहे.

देवांच्या सहवासामध्यें असताना अनन्यसाधना करण्याची काय बरे आवश्यकता आहे. या मुक्कामामध्यें वामनरावजींनीं आपल्या गुरुदेवांना सर्वतोपरी प्रसन्न केले. दत्तावतार श्री. टेंबेस्वामींची प्रसन्नता म्हणजे सर्वदात्या परमेश्वराची प्रसन्नता ! याच मुक्कामामध्यें टेंबेस्वामींनीं वामनरावजींना योगासनांचें शिक्षण दिलें. योगामध्यें टेंबे स्वामींचा अधिकार फार मोठा होता. अशा थोर योगज्ञ गुरूकडून योगशिक्षा मिळवून वामनरावजींनीं दीर्घकाल योगाचा अभ्यास केला. त्याचा परिणाम म्हणजे आजही वयाच्या ८५ व्या वर्षीं त्यांचें शरीर पूर्ण निरोगी, सुदृढ आणि कांतिमान आहे. श्रीगुरूंच्या सहवासांतील हे सोनियाचे दिवस कधींच संपू नयेत असें वामनरावजींना वाटत होतें. पण वडिलांच्या श्राद्धासाठीं वानरावजीना घरी जाणें प्राप्तच होतें त्यामुळें अत्यंत जड अंतःकरणानें त्यांनीं गुरूमाउलीचा निरोप घेतला.

यानंतर गुरुशिष्यांची भेट पुनः शके १८३३ मध्यें झाली. टेंबे स्वामींचा यावर्षीचा चातुर्मास कुरूगडी येथें झाला. येथून स्वामी हिंगोलीमार्गे पिंपरी येथें गेले व तेथेंच स्वामींची व वामनरावजींची पुनः भेट झाली. तेथून स्वामीबरोबर वामनरावजी औंढ्यानागनाथ येथें गेले व येथें त्यांना हावनुर मुक्कामामध्ये स्वामीपासून शिकलेली योगासनें त्यांच्याच समोर करून दाखविण्याची संधी मिळाली. योगासनांमधील वामनरावजींची प्रगति पाहून स्वामीनी समाधान व्यक्त केलें.

यापुढील चातुर्मास्यामध्ये वामनरावजींनी औदुंबर येथें गुर्वाज्ञेने "श्रीमाला" मंत्राचें पुरश्चरण केलें. पण अकस्मात आलेल्या अशौचामुळें हें पुरश्चरण तीन हजारांनीं कमी झालें. कारण दहा दिवसांच्या अशौचामध्यें झालेला जप जमेस धरला गेला नाहीं. असा स्पष्ट स्वप्नदृष्टांत वामनरावजींचे स्नेही दादासाहेब मंत्री यांस झाला. शके १८३५ मध्यें वामनरावजींची व स्वामींची पुनर्भेट श्रीक्षेत्र गरुडेश्वरी झाली. शक्तिप्रवर्तक संप्रदायाचे श्रीयोगानंद यांची व स्वामींची याच मुक्कामामध्यें भेट झाली होती. या वर्षीं स्वामींची अवतारसमाप्ती झाली व गरुडेश्वरी त्यांनीं समाधि घेतली. अशा तऱ्हेने या अलौकिक गुरु-शिष्यांची लौकिक अर्थानें कायमची ताटातूट झाली. पण खऱ्या अर्थानें स्वामींचें चिरवास्तव्य वामनरावजींच्या सान्निध्यामध्येंच आहे.

### चित्रकला शिक्षकाची नोकरी

या पुढील काळांत यशवन्तराव वैद्य यांच्याशीं वामनरावजींचा संबंध आला व त्यांच्याच प्रयत्नांनीं बार्शीच्या म्युनिसिपल शाळा नं. १ मध्यें वामनरावजींनीं ड्रॉइंग शिक्षकाची नोकरी पतकरली. येथे वामनरावजींनीं दहा वर्षें नोकरी केली. वैद्यमास्तर यांस मूलबाळ कांहीं नव्हतें. ते वारकरी संप्रदायाचे असून त्यांना योगाची आवड होती. वामनराव ब्रह्मचारी असून योगानुष्ठान करतात व त्यांच्यावर प.पू. श्री टेंबे स्वामी यांची कृपा झालेली आहे वगैरे माहितीमुळें व वामनरावजींची आचार निष्ठा वगैरे स्वतः पाहिल्यामुळें वैद्य दांपत्यांची वामनरावजींवर वात्सल्ययुक्त माया निर्माण झाली व प्रथम कांहीं दिवस वामनराव वैद्यमास्तरांच्या बिऱ्हाडींच राहूं लागले. पुढें स्वतंत्र बिऱ्हाड करून त्यांनी मातोश्री व गोदूताई यांस बार्शी येथें बोलावून घेतलें. अशा तऱ्हेनें वैद्यमास्तर व वामनराव या समान शीलवन्तांचा स्नेह दीर्घकाळ टिकला.

---

# गीतेचें सारभूत मार्गदर्शन

## (लेखांक चौथा).

लेखक—डॉ. ग. य. परांजपे, रत्नागिरी

---

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोसि मे ॥** गीता. अ. श्लो. १८/३५

मागील तीन लेखांमध्यें ‘मन्मना भव’ यांतील अर्थ स्पष्ट कळण्याचे दृष्टीनें भगवान ‘मी’ असे कोणत्या स्वरूपाला उद्देशून म्हणत आहेत त्याचा आपण शोध घेतला आहे. गीताशास्त्राचा प्रथमपासून अकराव्या अध्यायाच्या अखेरीपर्यंत या दृष्टीनें धांडोळा घेऊनहि आपण अद्याप पूर्ण निर्णयाप्रत येऊं शकलो नाहीं. आतां बाराव्या अध्यायाच्या आशयांत बुडी मारून बुद्धीच्या

हाताला काय लागतें ते पहावयाचें आहे. बाराव्या अध्यायांतील अर्जुनाच्या शंकेतूनच याचें नेमके उत्तर आपणाला सांपडणार आहे.

अर्जुनाला उपदेश करणारे भगवान हे सगुण तसेच निर्गुण असून विश्वरूप पसारा हा त्याचाच अविभाज्य भाग आहे हे अर्जुनानें जाणले आहे. अकराव्या अध्यायांत भगवंतांनी अर्जुनाला अव्यक्त अशा निर्गुण स्वरूपावर विशेष प्रेम करण्याविषयी बजावून सांगितले आहे. परंतु अर्जुनाला हीच गोष्ट नेमकी पटली नाही. देहवंत जीवांनीं अव्यक्त स्वरूपावर प्रेम करणें एकतर कठीण, आणि विशेष आनंददायीहि नाहीं, असें अर्जुनाला स्वानुभवाने वाटत आहे. म्हणून याचा उलगडा आपल्या मताप्रमाणें होतो, कां भगवंताच्या इच्छेलाच आपणाला मान देणे आवश्यक आहे हे त्याला समजून घेणें आवश्यक झालें आणि त्यानें प्रश्न केला तो ज्ञानेशांच्या शब्दांत असा आहे--

**ओव्या**—

तरी व्यक्त आणि अव्यक्त । हें तूचि एक निभ्रांत ।
भक्तीं पाविजे व्यक्त । अव्यक्त योगे ॥ २३
या दोनी जीं वाटा । तूतें पावावया वैकुंठा ।
व्यक्ताव्यक्त दारवंटा । रिगिजे येथ ॥ २४ ॥
पैंजे वानी श्यातुका । तेचि वेगळीये वालाएका ।
म्हणोनि एकदेशीया व्यापका । सरिसा पाडू ॥ २५ ॥
अमृताचिये सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी ।
तेचि दे अमृत लहरी । चुळी घेतलिया ॥ २६ ॥
हें कीर माझ्या चित्तीं । प्रतीती आथीजी निरुती ।
परी पुसणें योगपती । तें याचि लागीं ॥ २७ ॥

भावार्थ — अर्जुन म्हणतो. देवा व्यक्त आणि अव्यक्त हीं दोन्ही तुझींच रूपे असुन भक्तांना तुझ्या व्यक्त स्वरूपाची प्राप्ती होते तर, योग्यांना अव्यक्त स्वरूपाची प्राप्ती होते. तुझ्या प्राप्तीचे, व्यक्ताचीं उपासना आणि अव्यक्ताची उपासना, असे दोन मार्ग आहेत. मग अव्यक्ताची अत्यंत कठीण अशी साधना करण्यापेक्षां व्यक्त अशा तुझ्या सगुण स्वरूपाची उपासना केली तर काय बिघडेल? उत्तम शंभर नंबरी १०० तोळे सोन्याची लगडी घेतली किंवा त्यांतील एक वालभर सोने घेतलें आणि तें कसोटीवर घांसलें तर दोहोंचा

कस सारखाच लागणार नाहीं का ? संपूर्ण अमृतसागराची गोडी त्यांतील एका लहरींतून चूळ भरून घेतल्यानें मिळतेच ना ? अर्थात्, याच नियमाप्रमाणे तुझ्या अव्यक्त अशा विशाल स्वरूपांतून व्यक्त अशा मर्यादित स्वरूपाची भक्ती बिलकूल हिणकस ठरणार नाहीं, कीं गोडीला उणीव येणार नाहीं ! परंतु मला वारंवार व्यक्तापेक्षां अव्यक्तावर प्रेम करण्याविषयीं जे बोललास त्यामुळेंच मला विचारणें भाग पडत आहे. माझा आत्मप्रत्ययमात्र सगुण भक्तीच सर्वश्रेष्ठ आहे असाच आहे ! यावर तुझें मत काय ?

( अपूर्ण )

## शिरडी–वृत्त

### ऑगस्ट–१९७०

हा महिना श्रावण महिना असल्यानें बाहेरगावचे भक्तांची गर्दी बरीच होती. शिवाय या महिन्यात सत्यनारायणपूजा अभिषेकपूजा बऱ्याच झाल्या. काही कलाकारानीं श्रीपुढे हजेरी दिली. ती खालील प्रमाणेः—

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. रामराव पाटील मु. पेठ. ता. चिखली. जि. बुलढाणा विदर्भ.
श्री. ह. भ. प. हिंमतमहाराज मोरे, मु. तळेगाव, चाळीसगाव, पु. खा.
श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने, पुणे.
श्री. ह. भ. प. लक्ष्मणमहाराज वाघचौरे शिर्डी.
श्री. मराठे. संस्थान गवई. नेहमीप्रमाणे.

**प्रवचन**

श्री. ह. भ. प. विठ्ठलदास केशवदास भानुशाली, मु. अंबरनाथ, कल्याण ता. जि. ठाणे.
श्री. ह. भ. प. लक्ष्मणमहाराज शिर्डी.

## भजन

श्री. जयलक्ष्मी अम्मा, मद्रास भजनी मंडळ

श्री. चक्रभुजनाथ भजनी मंडळ मु. राजगड जि. धार. मध्य. प्रदेश.

श्री. रामभक्तभजनवृंदम् मु. कडप्पा. ( आंध्रप्रदेश )

श्री. चेनानी कुराजी माळवी. मनमाड. ( नाशिक )

## स्वराज्यप्राप्ति दिन

१५ ऑगस्ट रोजी श्री साईबाबा संस्थान शिरडींतर्फे ध्वजवंदन संस्थान नोकर वर्ग व साईनाथ हायस्कूल शिक्षक व गुरुजी इतर प्रतिष्ठित गावकरी, होमगार्ड वगैरे सह, श्रीसाईंचे मंदिरावरील कळसाजवळ, मे. डी. डी. पाटणकर रिसीव्हर साहेब हे एकाएकी आजारी झाल्यामुळे मे. पिंटो मेडिकल ऑफिसर श्रीसाईनाथ हॉस्पिटल यांचे शुभ हस्ते मिरीकर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह यांचे अध्यक्षतेखाली झाले. या निमित्त सर्व चहापान देण्यात आले, २ रात्रौ दीपोत्सव व संगीत भजन झाले.

## नवल विशेष

श्रीकृष्णजयंतीनिमित्त श्रींचे मंदिरात ता. २३।८।७० रविवाररोजीं रात्रौ श्रीकृष्णजन्म कीर्तन संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचे झाले. व दुसरे दिवशी गोपाळकाला कीर्तन दहीहंडी व रात्रौ श्रीचे रथाची गांवांतून मिरवणूक झाली.

## थोरा मोठ्याच्या भेटी

( १ ) श्री हरिश्चन्द्र पाटील कृषिविद्यापीठ राहूरी ( २ ) श्री. एम्.व्ही. कमिशनर सा. पूना डिव्हीजन (३) श्री. पी. एस. पाळंदे कलेक्टर सा. अहमद-नगर ( ४ ) श्री अमृतलाल यादव डेप्युटी मिनिस्टर ऑफ कोऑपरेटिव्ह राजस्थान ( ५ ) श्री. लाल कलेक्टर ऑफ सेंट्रल एकसाईज पूना.

## शिर्डी हवापाणी

सारखा झिम झिम पाऊस हवा कुंद अभ्राच्छादित होती.

**Books published and sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फें प्रकाशित
## व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ५–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | — |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ५–२५ |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ६–०० |
| (६) | A Glimpse of Indian Spirituality–by Pradhan | | | १–५० |
| (७) | A Glimpse of Indian Spirituality | (Telugu) | | १–०० |
| (८) | श्रीसाईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–७५ |
| (९) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. मीष्म | ००–२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. मीष्म | ००–२५ |
| (१३) | श्रीरुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१५) | श्रीसाईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (१६) | Guide to Shirdi | (English) | | ००–१२ |
| (१७) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 P. and 50 P. for No. 1. Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dist. Ahmednagar.

2. **Sai Baba Office ‘ Sai Niketan,’**
   Dr. Ambedkar Road, 804 B, Dadar, Bombay 14.